सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ०२ नोव्हेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २२० | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## फडणवीस यांच्या सुरक्षेत वाढ; एकूण १८ जवान तैनात!

मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आली आहे.



फडणवीस यांना सध्या झेड प्लस सुरक्षा व्यवस्था होती. आता, त्यातही वाढ करत आता फोर्स वनचे चार अत्याधुनिक शस्त्रधारी कमांडो त्यांच्यासोबत असणार आहेत.

ऐन निवडणुकीच्या धामधुमीत फडणवीस यांच्या सुरक्षा व्यवस्थेत वाढ करण्यात आल्याने चर्चांना उधाण आले आहे. आता एकूण १८ जवान एका वेळी सुरक्षेसाठी तैनात असणार आहेत. यामध्ये गनमॅनच्या संख्येत वाढ करण्यात आली आहे. एसआयडीच्या गोपनीय रिपोर्टमुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सुरक्षा अलर्टवर आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या जीवाला धोका असल्याने ही सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

# मुहूर्त ठरला! नरेंद्र मोदींची महाराष्ट्रातील पहिली सभा होणार ८ तारखेला, प्रचारसभांचा धमाका

मुंबई : महाराष्ट्रातील विधानसभा निडणुकांच्या अनुषंगाने राजकीय वातावरण तापलं असून एमेकांवर टीका-टिपण्णी व राजकीय फटाके फोडले जात आहेत. त्यातच, आता बड्या नेत्यांच्या सभांचीही तारीख व वेळ निश्चित केली जात आहे. ५ नोव्हेंबरपासून शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आपल्या राजकीय प्रचार दौऱ्याला सुरुवात करत आहेत. उद्धव ठाकरेंची सभा पहिली निवडणूक प्रचारसभा रत्नागिरी जिल्ह्यातून सुरु होईल. त्यानंतर, राज्यभरात त्यांच्या १५ सभा घेतल्या जाणार असल्याची माहिती आहे. आता, राज्यातील पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या पहिल्या सभेची तारीख ठरली आहे. विधानसभा निवडणुकांसाठीच्या पहिल्या टप्प्यातील प्रचारासाठी नरेंद्र मोदींचा महाराष्ट्र दौरा निश्चित झाला असून नरेंद्र मोदी



८ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रात येणार आहेत. धुळे शहरातील मालेगाव रोडवर असलेल्या या सभेसाठी खान्देश गो शाळेच्या मैदानावर जय्यत तयारी सुरु झाली आहे. तब्बल ४५ एकरवर ही सभा होणार आहे. एक लाख नागरिक या सभेला येणार आहे.

राज्यात महायुतीची पहिली मोठी सभा ८ तारखेला होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानसभा निवडणुकांच्या प्रचार सभांचा नारळ फुटणार आहे. नरेंद्र मोदींनी त्यांच्या दौऱ्यात उत्तर महाराष्ट्राला २ सभा दिल्या आहेत. त्यापैकी, नाशिकला एक आणि धुळ्याला एक सभा होईल, मोदींच्या या दोन्ही सभा रेकॉर्ड ब्रेक होणार, असे भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटले. नाशिकच्या ग्राउंडला तर मोदी ग्राउंड नाव दिले आहे, येथे लाखोंची सभा होणार आहे, असेही महाजन यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या प्रचारयंत्रणेत भाजपने केंद्रीयमंत्र्यांनाही उतरवले आहे. त्यामुळे, भाजपच्या स्टार प्रचारकांच्या यादीत असलेल्या केंद्रातील नेत्यांच्याही सभा होणार आहेत. त्यातच, महाराष्ट्रात नरेंद्र मोदीसुद्धा जास्त वेळ देतील, नाशिकला अजिबात दुर्लक्ष केलं नाही. याशिवाय, धुळ्याला, नंदुरबारलाही जाणार आहेत. मोदींच्या सभांचं दौऱ्याचं नियोजन अहमदनगरसह ५ जिल्ह्यांत असल्याची माहिती गिरीश महाजन यांनी दिली.

दिवाळीनंतर फोडू फटाके

आमदार एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाबद्दल बोलताना गिरीश महाजन म्हणाले की, दिवाळीनंर नंतर फटाके फोडू, यामध्ये अडचणी काय, फटाके फोडायची आणि लावायची फार घाई करू नका.

महायुतीतील २ उमेवाराबाबत निर्णय होईल

राज्यातील काही मतदारसंघात महायुतीचे २ उमेदवार उभे करण्यात आले आहेत. याबाबतही महाजन यांनी भूमिका स्पष्ट केली. उमेदवारी अर्ज माघारी घेईपर्यंत निर्णय होतील, ताणतणाव आहे पण चर्चे अंती निर्णय होईल. सावजी साहेब आमचे नेते, मार्गदर्शक आहेत, मान सन्मान ठेवला जाईल. पक्षाने, हरिभाऊंना राज्यपाल म्हणून पाठविले की नाही , आता मला मार्गदर्शक करू नका, असे म्हणत मिश्कील टिपण्णीही त्यांनी केली. तसेच, आंदोलन आणि पक्षात त्यांचं मोठं योगदान आहे, त्यांना मोठं पद मिळेल.

## ऐन दिवाळीत खिशाला ताण, ६२ रूपयांना महागला गॅस सिलेंडर

मुंबई: देशभरात दिवाळीचा उत्साह प्रचंड आहे. त्यात ऐन दिवाळीतच सामान्यांना मोठा झटका बसला आहे. दिवाळीला महागाईचा जोरदार झटका बसला आहे. लक्ष्मीपुजनाच्या दिवशीच म्हणजे १ नोव्हेंबरला गॅस सिलेंडरच्या दरात वाढ झाली आहे. यामुळे खिशाला चांगलाच फटका बसणार आहे.



१९ किलोग्रॅम वजनाच्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात वाढ झाली आहे. १९ किलोच्या कमर्शियल एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात ६२ रूपयांची वाढ झाली आहे. दरम्यान, तेल कंपन्यांकडून १४.२ किलोग्रॅम वजनाच्या सिलेंडरच्या दरात कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. कमर्शियल गॅस सिलेंडरचे वाढलेले दर आजपासून म्हणजेच १ नोव्हेंबर २०२४ पासून लागू होतील.

आज नोव्हेंबरचा पहिला दिवस आहे. दर महिन्याच्या पहिल्या तारखेला एलपीजी गॅस सिलेंडरचे दर ठरवले जातात. तेल कंपन्यांनी शुक्रवारपासून १९ किलोच्या कमर्शियल सिलेंडरच्या दरात ६२ रूपयांनी वाढ केली आहे.

दिल्लीमध्ये सिलेंडरचे दर - १७४० रूपयांवरून वाढून १८०२

कोलकातामध्ये सिलेंडरचे दर - १८५० रूपयांवरून वाढ १९११.५० रूपये

मुंबईत सिलेंडरचे दर - १६९२ रूपयांवरून वाढून १७५४ रूपये

चेन्नईत सिलेंडरचे दर - १९०३ रूपयांवरून वाढून १९६४ रूपये

## माहीममधील मतदार माझ्या पाठीशी: सदा सरवणकर

### निवडणूक लढण्यावर ठाम

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१ नोव्हेंबर : माहीम मतदारसंघातून राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना पाठिंबा देण्यासाठी भाजपासह स्वतःच्या पक्षातील नेत्यांचा मोठा दबा दबाव असूनही शिंदे गटाचे विद्यमान आमदार सदा सरवणकर निवडणूक लढवण्यावर ठाम आहेत आपल्या पाठीशी इथली जनता असल्याने निवडणूक रिंगणातून माघार घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी शुक्रवारी सांगितले.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिलेल्या व विधानसभा निवडणुकीत ही भाजपाचा मुख्यमंत्री होण्यासाठी समर्थन देण्याची आश्वासन देणाऱ्या राज ठाकरे यांचें पुत्र अमित ठाकरे यांना महायुतीकडून पाठिंबा देण्यात यावा, अशी उघड भूमिका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपा व शिंदे गटातील अनेक नेत्यांनी उघडपणे बोलून दाखवली आहे. त्यामुळे या मतदारसंघातील लढतीकडे सगळ्या राज्याचे लक्ष लागून राहिलेले आहे. भाजप नेत्यांच्या मागणीबाबत मुख्यमंत्री शिंदे यांनी अद्याप आपली भूमिका उघड केली नसलीतरीही गुरुवारी सरवणकर हे वर्षा निवासस्थानी त्यांची भेट घेण्यासाठी गेले असता त्यांना ते भेटले नाहीत . त्यामुळे मुख्यमंत्री नाराज असल्याचेही चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे याबाबत सर्वांकर यांना आज विचारणा केली असता त्यांनी ते फेटाळून लावले ते म्हणाले , मला जेव्हा वेळ असतो त्यावेळी मी वर्षा बंगल्यावर जात असतो काल मी गेलो. त्यावेळी मुख्यमंत्री हे विश्रांती घेत होते त्यामुळे भेट झाली नाही . त्यामुळे तेथील स्टाफ चर्चा करून मी परत आलो. या मतदारसंघातून माघार घ्यावी अशी भाजपाची इच्छा असली तरी जनतेचा आशीर्वाद माझ्याबरोबर आहे .त्यामुळे मी माघार घेण्याचा काही प्रश्नच येत नाही महायुतीत आम्ही म्हणजचे भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी आणि इतर पक्ष असेच आहोत मनसे आमच्या विरोधात आहे हे चित्र स्पष्ट आहे. असे वक्तव्य ही देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.उद्धव ठाकरेंच्या पक्षाने काहीही काम केलेले नाही. उलट ज्या माणसाने आपल्याला ३६५ दिवस काम केले आहे. आपल्यातल्या शिवसैनिकाला म्हणजेच लोक मला निवडून देतील याची खात्री असल्याचेही त्यांनी सांगितले.

# रश्मी शुक्ला आजही आमचे फोन फोन टॅप करत आहेत : संजय राऊत यांचा आरोप

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१ नोव्हेंबर : राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांना तात्काळ पदावरून व्हावे अशी काँग्रेसकडून सातत्याने मागणी होत असताना ठाकरे गटाचे नेते खा संजय राऊत यांनीही त्याच्याबाबत आक्षेप व्यक्त केला.

रश्मी शुक्ला यांच्याकडून आजही आमचे फोन टॅपिंग होताहेत. आमचे जे प्रमुख लोक आहेत, त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना तडीपार केलं जात आहे, असा आरोप त्यांनी केला आहे.

ते म्हणाले ,' फडणवीस यांनी त्यांना पुन्हा पदावर घेतले त्यामुळे आमच्या कार्यकर्त्यांवर मक्को, तडीपारीच्या नोटीस लावून निवडणूक आपल्या ताब्यात घ्यायची, असा प्रयत्न पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याकडून होत आहे. आजही आमचे फोन टॅपिंग होत आहेत. आमचे जे प्रमुख लोक आहेत, त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना तडीपार केले जात आहे, अशा पद्धतीचा दबाव रश्मी शुक्ला यांच्यावर आहे. रश्मी शुक्ला यांना का हटवलं जात नाही? त्यांची नेमणूकच बेकायदेशीर आहे. निवडणूक आयोगाला आम्ही वारंवार सांगत आहोत की, तुम्हाला पारदर्शकपणे निवडणुका करायच्या असतील, तर तुम्हाला रश्मी शुक्ला यांना हटवावेच लागेल. ज्यांच्यावर आरोप होते त्यांनाच पुन्हा फडणवीस यांनी पदावर घेतले,

दीपोत्सवाच्या निमित्ताने राजकीय प्रचार :राज ठाकरे यांच्या मनसेने शिवाजी पार्कवर केलेल्या दीपोत्सवाच्या कार्यक्रमावरून आचारसंहितेचा भंग झाल्याची तक्रार उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केली आहे. त्याबाबत राऊत म्हणाले की, आतापर्यंत असे कार्यक्रम हा एक सोहळा असायचा. तेव्हा निवडणुका व्हायचा नाहीत. आता निवडणुका जाहीर झाल्यात. अशा वातावरणात दीपोत्सवाच्या निमित्ताने राजकीय प्रचार होत असून, आचारसंहितेचा भंग होणार असेल आणि त्यावर कोणी आक्षेप घेतला असेल तर तो चुकीचा नाही. निवडणूक आयोग याची योग्य ती दखल घेईल,

माहीममध्ये अमित ठाकरे आणि सदा सरवणकर यांच्या उमेदवारीवरून सुरू असलेल्या वादाबाबत ते म्हणाले की, माहीमचा विषय हा त्यांचा अंतर्गत विषय आहे. ज्या पक्षाकडून शिवसेनेची मते कापली जातील त्यांना मदत करायची ,हे भारतीय जनता पक्षाचं राष्ट्रीय धोरण आहे. गद्दारांच्या माथी अनेक ठिकाणी माती खायची वेळ आलेली आहे,' असे त्यांनी सरवणकर यांचे नाव न घेता त्यांना टोला लगावला.

## देशातील विमानांना बॉम्बची धमकी देणार अटकेत, नागपूर पोलिसांनी घेतले जगदीश उईकेला ताब्यात

नागपूर, ०१ नोव्हेंबर : देशभरातील विविध विमानतळांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा आरोपी जगदीश उईके अखेर पोलिसांच्या ताब्यात आला आहे. नागपूर पोलिसांच्या सायबर सेलकडून त्याची कसून चौकशी सुरू आहे. या कारवाईबाबत पोलिसांकडून गुप्तता बाळगण्यात येत आहे. मागील काही दिवसांपासून विमानतळांना उडविण्याची धमकी येत असल्याने विमानसेवा प्रभावित झाली होती. दिवाळीपूर्वी २५ ते ३० ऑक्टोबरदरम्यान काही दहशतवादी संघटना ३० ठिकाणी बॉम्बस्फोट घडवून आणणार असल्याबाबतचा ई-मेल केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, महासंचालक रेल्वे सुरक्षा दल, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि गृहराज्यमंत्री यांना पाठविण्यात आले होते. त्यानंतर नागपूर पोलिस सतर्क झाले. ई-मेल पाठविणाऱ्या तरुणाची पोलिसांनी ओळख पटवली. याआधी जगदीशला २०११ मध्ये दहशतवाद्यांवर लेख लिहिल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. तपासादरम्यान नागपूर पोलिसांच्या विशेष शाखेच्या पथकाला २१ ऑक्टोबर रोजी जगदीशने ई-मेल पाठविल्याचे निष्पन्न झाले होते. जगदीशच्या ई-मेलनुसार, सहा विमानतळ हे दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदचे लक्ष्य आहेत. यासोबतच विविध विमान कंपन्यांच्या ३१ विमानांचे अपहरण करण्यात येणार आहे. त्याच्याकडे '२५ एमबीए - एमटीआर-१०' हा गुप्त टूलकिट कोड आहे. या कोडचा अर्थ ५ बाजार, ५ बसस्टँड, ६ विमानतळे, ५ मंदिरे, ५ रेल्वे स्थानके असा होतो. हा ट्रेलर आहे,

## इएसएच्या प्रोबा-३चे इस्त्रो करणार प्रक्षेपण

बंगळुरू, ०१ नोव्हेंबर : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) आगामी ४ डिसेंबर रोजी युरोपीयन स्पेस एजन्सीच्या (इएसए) प्रोबा-३ या मिशनचे प्रक्षेपण करणार आहे. या मिशनसाठी आवश्यक असणारी अचुकता १ मिलिमीटरची आहे. १ मिलीमीटर म्हणजे फार फार तर आपल्या नखाची जाडी. इतक्या अचुकतेने या मिशनमधील दोन्ही स्पेसक्राफ्ट पृथ्वीच्या कक्षेत कार्यरत ठेवायची आहेत.

सूर्याच्या बाह्य बाजूने अस्पष्ट असे वातावरण आहे, त्याला कोरोना असे नाव आहे. कोरोनाचा अभ्यास सध्या फक्त सूर्यग्रहण असलेल्या दिवशीच होऊ शकते. पण प्रोबा-३ या मिशनची रचना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. या मिशनमधील एका स्पेसक्राफ्टची सावली दुसऱ्यावर पडणार आहे, म्हणजेच कृत्रिम ग्रहणाची स्थिती निर्माण होईल. त्यामुळे प्रोबा-३ मिशन सूर्याच्या भोवतीच्या वातावरणाचा अभ्यास अव्याहतपणे करू शकणार आहे. पण ही स्थिती साध्य करण्यासाठी हे स्पेसक्राफ्ट अत्यंत अचूकरीत्या पृथ्वीच्या कक्षेत कार्यरत ठेवायचे आहेत. ही अचुकता फक्त १ मिलीमीटरची आहे. बेल्जियम येथील रेडवायर स्पेस येथे हे दोन स्पेसक्राफ्ट बनवण्यात आले आहेत. ते आता भारतात पाठवण्यात येत आहेत.

# शहर परिसरात 'धूम' धडाक्यात लक्ष्मीपूजन लक्ष-लक्ष दिव्यांनी उजळला आसमंत

### आतषबाजीने आकाशात विविध रंगांची पखरण, आठतास फटाक्यांची आतषबाजी

छत्रपती संभाजीनगर- शहर परिसरात शुक्रवारी, १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी घराघरांत तसेच बाजारपेठांतील दुकानांसह व्यापाऱ्यांच्या फर्ममध्ये थाटामाटात मनोभावे श्रीलक्ष्मीपूजन पार पडले. लक्ष्मीपूजनानंतर सायंकाळी ६ वाजेपासून फटाक्यांच्या आतषबाजीसह लक्ष-लक्ष दिव्यांनी आसमंत उजळून निघला. सायंकाळी ६ ते मध्यरात्रीच्या दोन असे तब्बल ८ तास शहरात फटाक्यांची 'धूम' सुरू होती.

गेल्या आठवडाभरापासून बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी झुंबड उडाली होती. नवीन कपडे, खाद्यपदार्थ, फटाके व इतर साहित्यांच्या खरेदीसाठी दुकाने ग्राहकांनी फुलून गेल्याचे चित्र होते. नवी जाधववाडीसह विविध ठिकाणी व्यापाऱ्यांनी चोपड्यांचे पूजन करून श्रीलक्ष्मीपूजन आहे.

गुरुवारी, ३१ रोजी पहाटे नरकचतुर्दशीनिमित्त उटणे, सुवासिक तेलाने अभ्यंगस्नान करून दिवाळीला सुरुवात झाली. सायंकाळी विविध मंदिरे, बाजारपेठांत, दुकानांसमोर, घरासमोर सडा-सारवण करून अंगणात विविधांगी कलाकुसरच्या विविध रंगी रांगोळ्या लक्ष वेधून घेत होत्या. त्यानंतर घराघरांत दुपारपासूनच पूजेची जय्यत तयारी सुरू झाली. उस, पाच फळे, केरसुणी, मिठाईचा नैवेद्य, पाने-फुलांची आरास, पासबुक, चेक, एटीम, रोकड आदी साहित्यांसह हिशोबाच्या वह्या-पेन श्रीलक्ष्मीच्या मूर्तीसमारे मांडण्यात आल्या होत्या. बाजारपेठांसह घराघरांत नवीन कपडे परिधान करून उत्साहात लक्ष्मीपूजन पार पडले.

आबालवृद्धांनी लुटला आनंद

श्रीमहालक्ष्मीच्या आरतीनंतर श्रीफळ वाहून आणि लाह्या-बत्ताशांचा प्रसाद वाटूप तुफान फटाक्यांच्या आतषबाजीला सुरुवात झाली. पणत्या, आकाश दिवे, विविधरंगी विद्युत रोषणाईने आसमंतात विविध रंग उधळले. रात्री उशिरापर्यंत फटाक्यांची आतषबाजी सुरू होती. आबालवृद्धांनी फटाके फोडण्याचा आनंद लुटला.

बाजारपेठा फुल्ल

गेल्या १५ दिवसांपासून शहरात दिवाळी सणाच्या खरेदीसाठी बाजारपेठांमध्ये ग्राहकांची गर्दी उसळली होती. कापड बाजारात तुडुंब गर्दी दिसून आली. खरेदी करताना ग्राहकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. नवीन कपड्यांसह सोने, खाद्यपदार्थ, इलेक्ट्रॉनिक वस्तू, भेटवस्तू, सुका मेवा, वाहने खरेदीवर नागरिकांच्या उड्या पडल्या. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात दिवाळी आल्यामुळे समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांनी खरेदीचा आनंद लुटला. तशी मंगळवार, २९ ऑक्टोबर रोजी वसुबारसपासून दिवाळी सणाला सुरुवात झाली. गुरुवारी नरकचतुर्थीच्या दुसऱ्या दिवसापासून घराघरांत लक्ष्मीपूजनाची लगबग सुरू होती. घरासमोर सडा-रांगोळी काढून अंगण सजले. आकाश कंदील, विद्युत रोषणाईने घराची शोभा वाढविण्यात आली. शुक्रवारी सकाळपासून लक्ष्मीपूजनासाठी मुहूर्त देण्यात आले असले तरी सायंकाळी ६ वाजेनंतर लक्ष्मीपूजनाची तयारी सुरू झाली. धर्मशास्त्राच्या आधारे प्रदोषकाळ असल्यामुळे सायंकाळी ४.३० ते ८.३० वाजेपर्यंत लक्ष्मीपूजन करण्यास हरकत नाही, असे तज्ज्ञांनी सांगितले होते. घराघरांत मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात लक्ष्मीपूजन पार पडले. बाजारपेठेत, प्रतिष्ठाने, दुकानांमध्येही लक्ष्मीपूजन मनोभावे व उत्साहात करण्यात आले.

फटाक्यांची आतषबाजी


शहरात यावर्षी दिवाळीच्या लक्ष्मीपूजनाला फटाक्यांची आतषबाजी झाली. घरोघरी सुरसुऱ्या, भुईनळे, भुईचक्कर, सुतळी बॉम्ब, सेव्हन आवाज, बारा आवाज, रॉकेट, नागगोळी, रेल्वे, बेगडी बॉम्ब, अनार आदी फटाके फोडण्यात आले. आकर्षक रोषणाई करणाऱ्या फटाक्यांनी आसमंत उजळून निघाला. फटाके फोडण्यासाठी बच्चेकंपनीची धावपळ सुरू होती. बाजारपेठेसह घरासमोर फुटणाऱ्या फटाक्यांचा धडाड 'धूम' आवाज लक्ष वेधून घेत होता. शहरात लक्ष्मीपूजनाला साडेतीन कोटीं रुपयांचे फटाके फोडण्यात आल्याचा दावा फटाके विक्रेत्यांनी केला आहे.

फुलांसह 'गरीबाची लक्ष्मी' ला भाव

लक्ष्मीपूजन करण्यासाठी सकाळपासूनच बाजारपेठेत नागरिकांची खरेदीसाठी लगबग सुरू होती. केळीची पाने, झेंडू-शेवंतीफुलांसह प्रसाद, उस, पाच प्रकारची फळे, नवीन कपडे, फराळ यांसह इतर साहित्यांची खरेदी सुरू होती. झेंडू फुलांनी बाजार बहरला होता. झेंडूचा भाव ६० ते ८० रुपये, तर शेवंती फुलांचे भाव ३०० ते ३५० रुपये किला दराने विक्री झाली. गरीबाची लक्ष्मी म्हणजे 'केरसुणी' चीही मोठ्या भावाने मोठ्या प्रमाणात विक्री झाल्याचे विक्रेता लक्ष्मण जगधणे याने सांगितले.

बाजार फुलला

सिटीचौक, सुपारी हनुमान, मछली खडक, सराफा बाजार, शहागंजी, राजाबाजार, पैठणगेट, गुलमंडी, कुंभारवाडा, रंगार गल्ली, कासारी बाजार, सिटी चौक, शहागंज, गजानन महाराज मंदिर, शिवाजीनगर, त्रिमूर्ती चौक, सिडको, पुंडलिकनगर एवढेच नव्हे तर मिटमिटा-पडेगाव ते मुकुंदवाडी ते चिकलठाणपर्यंत दिवाळी सण 'धूम' धडाक्यात साजरा झाला.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com










# टेम्पोची दोन दुचाकींना धडक ; १ ठार १ जखमी!

महाड : मुंबई–गोवा महामार्गावर भीषण अपघात घडल्याचे समोर आले आहे. एक भरधाव टेम्पो आणि दोन दुचाकीची जोरदार धडक झाल्याने हा अपघात घडला. या अपघातात एका दुचाकी स्वाराचा मृत्यू झाला असून दुसरा दुचाकी स्वार जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सायंकाळी ४ वाजून ४५ मिनिटांच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, मृत वैभव महाडीक (१८) आणि सिध्देश गंगाधर पवार दुचाकीवरून महाड बाजुकडे येत होते. शिंदेकोंड नजिक आले असता मागून येणाऱ्या टेम्पोने प्रथम सिध्देश पवार याच्या दुचाकीला धडक दिली. नंतर वैभव महाडीक याच्या दुचाकीला धडक दिली. या झालेल्या अपघातात दोनही दुचाकीस्वार जखमी झाले होते. त्यांना महाड ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले असता, त्यातील वैभव महाडीक याचा मृत्यू झाला तर सिध्देश पवार या जखमीला उपचारासाठी दुसरीकडे हलविण्यात आले असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

अपघात होताच दोन्ही जखमींना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. वैभव महाडीकला महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र वेळेत उपचार न झाल्यामुळे वैभवचा मृत्यू झाल्याचा आरोप त्याच्या कुटुंबियांनी केला. त्याचबरोबर दोषी असलेल्या डॉटरांवर गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचा पवित्रा पंढरीनाथ महाडीक आणि त्यांच्या इतर नातेवाईकांनी घेतला आहे.





















# विकास कामांच्या जोरावर सुज्ञ जनता मला भरघोस मताने निवडून देईल- तान्हाजी मुटकुळे

## तान्हाजी मुटकुळे यांनी दाखवली प्रचार रथांना हिरवी झेंडी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**

हिंगोली विधानसभा मतदारसंघात मागील दहा वर्षाच्या काळात रस्ते, पाणी, सिंचन आणि इतर केलेल्या विकास कामांच्या जोरावर मतदारसंघातील जनता कसल्याही अपप्रचाराला बळी न पडता मला भरघोस मतांनी विजयी करेल असा विश्वास भाजपचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांनी व्यक्त केला. दि १ नोव्हेंबर रोजी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करून भाजपचे प्रचार रथांना त्यांनी हिरवी झेंडी दाखवली.

हिंगोली विधानसभेतील महायुतीचे उमेदवार तान्हाजीराव मुटकुळे यांच्या प्रचारासाठी बनवण्यात आलेल्या प्रचार रथांना छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यासमोर झेंडी दाखवून प्रचारासाठी विधानसभेत रवाना करण्यात आले. यावेळेस सर्वप्रथम छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला वंदना करून या प्रचार रथांना झेंडा दाखवून संपूर्ण विधानसभेत प्रचाराकरिता रवाना करण्यात आले. यावेळी बोलतांना तान्हाजीराव मुटकुळे म्हणाले की, माझ्या दहा वर्षातील विकास कामांच्या जोरावर कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता हिंगोली विधानसभेतील सुज्ञ जनता मला भरघोस मतांनी निवडून देईल. केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यातील महायुतीच्या सरकारने देशातील जनतेसाठी विविध कल्याणकारी योजना राबवल्या आहेत. या योजनांचा लाभ सर्व घटकातील लोकांना मिळत आहे. लाभार्थ्यांच्या खात्यात थेट पैसे जमा होत आहेत. त्यामुळे लाभार्थी देखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मोठे समर्थक झाले आहेत. राज्यातील महायुती सरकारने अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, बेरोजगार तरूणांना रोजगार उपलब्ध करून ८ हजार आणि १० हजार महिना मानधन दिल्या जात आहे. मुलींचे संपूर्ण शिक्षण मोफत केले आहे. बसमध्ये महिलांना अर्धे तिकीट तर ज्येष्ठांना मोफत प्रवास, गोरगरीबांना वर्षातून तीन गॅस सिलेंडर मोफत दिल्या जात आहेत. अशा कित्येक कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. याशिवाय जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, आरोग्यसेवा, शिक्षण यासह विकासांची कामे देश, राज्य आणि प्रत्येक विधानसभेत महायुती सरकारने केली आहेत. त्यामुळे विरोधकांकडे काहीच मुद्दे नसल्यामुळे ते केवळ अपप्रचार करीत आहेत. परंतु विधानसभेतील जनता विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता यावेळीही मला भरघोरू मतांनी विजयी करणार असा विश्वास यावेळी तान्हाजी मुटकुळे यांनी व्यक्त केला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आमदार रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, ज्येष्ठ नेते दुर्गादास साकळे, शहराध्यक्ष कैलासचंद्र काबरा, प्रदेश युवा सदस्य शिवाजी मुटकुळे, युवा जिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण, संतोष टेकाळे, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, साहेबराव बांगर, माजी नगरसेवक राजेश गोटे, सदाशिव सूर्यतळ, उमेश गुठ्ठे, हमीद प्यारेवाले, के के शिंदे, प्रशांत सोनी, मोतीराम इंगोले, बाबा घुगे, संजय खंडेलवाल, संजय ढोके, मनोज शर्मा, शाम खंडेलवाल, राजेश अग्रवाल, मधुसूदन अग्रवाल, श्याम सुंदर मुंदडा, दिनेश बगडिया, गणेश सोळंके, शिवानंद होकर्णे, आशिष शर्मा, अशीष जैस्वाल, राजू यादव, सचिन शिंदे, गुड्डू देवकाते रजनीश पुरोहित, जय घोडे, नागेश बांगर, पद्माकर नायक, बंडू कराळे, अजय गुठ्ठे, श्रीरंग राठोड, साहेबराव शिंदे आदिसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्थागुशाच्या पथकाने पकडले देशी दारूचे ५० बॉक्स

## २ लाख ४० हजारांचा ऐवज जप्त

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**

तालुक्यातील कनेरगाव नाका शिवारात एका झोपडीतून स्थानिक गुन्हे शाखा आणि बासंबा पोलिसांच्या पथकाने देशी दारूचे ५० बॉक्स जप्त केले असून या दारूची किंमत अंदाजे २ लाख ४० हजार इतकी आहे. याप्रकरणी बासंबा पोलिस ठाण्यात एकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिस विभाग सतर्क झाला असून जिल्ह्यात कुठेही अवैध दारू, रोख रक्कम, भेटवस्तूची वाहतुक होणार नाही याची दक्षता धेतली जात आहे. त्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांनी विशेष पथके स्थापन केली आहेत.

हिंगोली ते वाशिम जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या कनेरगाव नाका शिवारात एका झोपडीत देशीदारूचे बॉक्स लपवून ठेवण्यात आल्याची माहीती गुन्हे शाखेचे निरीक्षक विकास पाटील यांना मिळाली होती. त्यावरून सपोनि शिवसांब घेवारे, उपनिरीक्षक विक्रम विठुबोने, जमादार आझम प्यारेवाले, नितीन गोरे, हरिभाऊ गुंजकर, साईनाथ कंठे, नरेंद्र साळवे, आकाश टापरे, शेख जावेद यांचय पथकाने गुरूवारी रात्रीच्या सुमारास शोध मोहीम हाती घेतली. कनेरगाव नाका शिवारातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या सर्व झोपड्यांची पोलिसांनी तपासणी सुरू केली होती. तब्बल दोन तासांच्या तपासणी नंतर एका झोपडीमध्ये देशीदारूचे बॉक्स आढळून आले. पोलिसंनी झोपडीत केलेल्या तपासणीत देशीदारूचे ५० बॉक्स आढळून आले असून त्याची किंमत २ लाख ४० हजार एवढी आहे. याप्रकरणी जमादार साईनाथ कंठे यांचय तक्रारीवरून बासंबा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणातील आरोपीला ताब्यात घेण्यातआले आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक हनुमंत भिंगारे, सपोउपनि मदन गव्हाणे, अंभोरे हे करीत आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सीमेवर तपासणी पथके तैनात करण्यात आले असून चोवीस तास वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे.

# दिवाळी विथ माय भारत अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**

येथील आदर्श महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांनी बसस्थानक, अग्रसेन चौक येथे स्वच्छता करून या दिवाळीत स्वच्छतेचा संदेश दिला. प्राचार्य डॉ. विलास आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. भारत सरकारच्या युवा व खेळ मंत्रालय यांनी दिवाळी विथ माय भारत सोबत राबविण्याचे निर्देश दिले. या अभियानाअंतर्गत सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करून लोकांना या द्वारे संदेश द्यावा व स्वच्छतेचे महत्त्व पटवून द्यावे जेणेकरून आपल्या घरात व सार्वजनिक ठिकाणी प्रसन्न वातावरण होईल. यात आदर्शच्या रासेयो स्वयंसेवकांनी बसस्थानक व अग्रसेन चौकात स्वच्छता करीत जनजागृती व स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यामध्ये प्रा. डॉ. सचिन हाटकर, डॉ. महेश मंगनाळे, श्री. मुडे, श्री. कांबळे श्री. अमोल, श्री सपाटे, श्री.गौरव,कु. दिपाली, कु.बगाटे कु. खेत्रे यासह ३० स्वयंसेवक सहभागी झाले.

# दिवाळीनिमित्त पांडे कुटुंबियांनी उभारला सुंदर किल्ला



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**

येथील नाईक नगरमध्ये पांडे दिवाळीनिमित्त सुंदर असा किल्ला उभारत भारतीय परंपरा जोपासली आहे. दरवर्षी पांडे कुटुंबियांकडून हा उपक्रम सुरू आहे.

नाईक नगरमधील पांडे कुटुंबात यंदा दिवाळीच्या निमित्ताने किल्ला आणि महालक्ष्मी पूजनाची विशेष सजावट करण्यात आली आहे. प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही हा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. सौ. मीरा पांडे, सौ. मीनल पांडे, सौ. पूजा पांडे आणि सौ. साक्षी पांडे यांनी या सजावटीत पुढाकार घेतला असून, घरातील या परंपरेत त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास, किल्ल्यांचे दर्शन आणि माहीती लहान मुलांना व्हावी हा यामागचा प्रमुख उद्देश आहे.

## संक्षिप्त वृत्त

**सरदार वल्लभभाई पटेल, इंदिरा गांधी यांना अभिवादन**

हिंगोली- सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि इंदिरा गांधी यांची पुण्यतिथीनिमित्त आज त्यांच्या प्रतिमेस निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच यावेळी राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना एकात्मतेची शपथ देण्यात आली. येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित या कार्यक्रमास तहसीलदार आश्विनकुमार माने, नायब तहसीलदार संतोष बोथीकर यांच्यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख व कर्मचारी यांनी सरदार वल्लभभाई पटेल आणि इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

**निवृत्तीवेतन धारकांनी हयातीचा दाखला सादर करावा**

हिंगोली- महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या नियम ३३५ नुसार निवृत्ती, कुटुंब निवृत्तीवेतन धारकांना दरवर्षी दि. १ नोव्हेंबर रोजीचा हयातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे. सदर हयातीचा दाखला संबंधित निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्तीवेतन धारक ज्या बँकेतून निवृत्ती वेतन घेतात त्या बँकेमार्फत जिल्हा कोषागारात सादर केला जातो. तसेच राज्य शासनाच्या धोरणानुसार अधिकाधिक निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्तीवेतन धारकांनी जीवन प्रमाणपत्र प्रणालीमार्फत डिजिटल लाईफ सर्टिफिकेट देण्यात यावे. डिजिटल लाईफ सर्टिफिकेट देताना निवृत्ती वेतन, कुटुंब निवृत्तीवेतन धारकांनी बँक खाते, पीपीओ क्रमांक, कोषागाराचे नाव अचूक निवडावे. सर्व राज्य शासकीय निवृत्ती, कुटुंब निवृत्तीवेतन धारकांनी हयातीचा दाखला सादर करण्यासाठी संबंधितांच्या बँकेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

**शेतकऱ्यांच्या सोयाबीनची आर्द्रता तपासून द्यावी**

हिंगोली- सोयाबीन आर्द्रता मोजण्यासाठी खरेदी केंद्रावर जे शेतकरी सोयाबीनचे नमुने घेऊन येतील त्यांना तात्काळ मॉईश्चर तपासून द्यावेत, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी यांनी सर्व खरेदी संस्थांना केले आहे. तसेच गावोगावी आपल्या कर्मचाऱ्यांना आर्द्रतामापक यंत्रासह पाठवून शेतकऱ्यांना प्रत्यक्ष सोयाबीन शेतमालाचे प्रात्यक्षिक दाखविण्यात यावे. तसेच १२ टक्के मॉईश्चर पेक्षा कमी आर्द्रता असलेले व एफएक्यू दर्जाचे सोयाबीनच खरेदी केंद्रावर विक्रीस आणावेत, यासाठी शेतकरी बांधवांना आवाहन करावेत. तसेच त्यांना सोबत माहितीपत्रकही वाटप करावेत, असे आवाहन सर्व खरेदी संस्थांना करण्यात आले आहे.

**२२ ठिकाणी दारू अड्ड्यावर पोलिसांचे छापे**

हिंगोली- दारूबंदी कायद्यांतर्गत पोलिस विभागाने २२ ठिकाणी अवैध दारू विक्रेत्याविरूध्द छापे मारले असून १ लाख ६१ हजार ३०० रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. आरोपीविरूध्द दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कार्यवाही करीत त्यांचेकडून ५ हजार २०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

# सैन्य दलात अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**

भारतीय सशस्त्र सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी सर्व्हिस सिलेक्शन बोर्डाच्या परीक्षेची पूर्वतयारी करून घेण्यासाठी नाशिक येथील नाशिक रोड, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये नवयुवक व नवयुवतींसाठी दि. २ डिसेंबर ते ११ डिसेंबर, २०२४ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ५९ आयोजित करण्यात येत आहे. या कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची निःशुल्क सोय करण्यात येणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी हिंगोली जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात दि. २२ नोव्हेंबर, २०२४ रोजी मुलाखतीसाठी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, हिंगोली यांनी केले आहे.

मुलाखतीस येताना डिपार्टमेंट ऑफ सैनिक वेल्फेअर पुणे (डीएसडब्ल्यू) यांच्या संकेतस्थळावर सर्च करून त्यामधील एसएसबी-५९ कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावेत. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये एसएसबी वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत घेऊन यावेत. उमेदवार हा कंम्बाईंड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (सीडीएसई-युपीएससी) अथवा नॅशनल डिफेंस अॅक्ढमी एक्झामिनेशन (एनडीए-युपीएससी) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी सी सर्टीफिकेट ए किंवा बी ग्रेडमध्ये पास झालेले असावेत. एनसीसी ग्रुप हेडक्कार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापीठ प्रवेश प्रणालीसाठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबीसाठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे.

# निवडणुक खर्चाची प्रथम लेखे तपासणी ५ नोव्हेंबरला

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी व ९४-हिंगोली विधानसभा मतदारसंघातून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांची प्रथम निवडणूक खर्च लेखे तपासणी निवडणूक खर्च निरीक्षक अर्जुन प्रधान यांच्या उपस्थितीत ५ नोव्हेंबर जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली येथे दुपारी १२ वाजता होणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूक लढवणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीत केलेल्या खर्चाच्या अचूक नोंदी ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी व ९४-हिंगोली या तिन्ही विधानसभा मतदार संघातील अंतिम झालेले सर्व उमेदवार अथवा त्यांच्या अधिकृत खर्च प्रतिनिधींनी खर्चाच्या दैनंदिन हिशोबाची नोंदवही व खर्चाचे प्रमाणकासह प्रत्यक्ष उपस्थित राहून ही तपासणी करून घेण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक खर्च नियंत्रण समितीचे नोडल अधिकारी दिगंबर माडे यांनी खर्च सनियंत्रण कक्षातर्फे केले आहे.

या लेखे तपासणीसाठी अनुपस्थित राहणाऱ्याविरुद्ध निवडणूक आयोगामार्फत लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ मधील बाब क्र. ७७ (१) मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल, असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे निवडणूक खर्च सनियंत्रण कक्षातर्फे कळविण्यात आले आहे.

# हिंगोली जिल्ह्यात १० हजारावर मतदारांची वाढ

## जिल्ह्यात ९ लक्ष ८४ हजार ७६४ मतदारांची नोंद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ नोव्हेंबर**

एकही मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी निवडणूक आयोग वेळोवेळी विविध मोहिमांच्या माध्यमातून मतदारांची नावनोंदणी करून घेत आहे. निवडणूक आयोग विविध ऑनलाईन प, विशेष शिबिरांचे आयोजन, स्वीप कार्यक्रम, निवडणूक आयोगाच्या एनव्हीएसपी संकेतस्थळांच्या माध्यमातून जिल्ह्यात १० हजार २२३ मतदार नावनोंदणी झाली असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी सांगितले.

महाराष्ट्र विधानसभा मतदारसंघाची आदर्श आचारसंहिता जिल्ह्यात १५ ऑक्टोबरपासून लागू झाली असून, या निवडणुकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी निवडणूक आयोग प्रयत्नरत आहे. त्यामुळे नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर जिल्ह्यात तब्बल १० हजार २२३ मतदार वाढ झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

मतदानाची टक्केवारी वाढविण्यात महिलावर्ग महत्त्वाची भूमिका बजावत असून, ३० ऑगस्ट २०२४ पर्यंत जिल्ह्यात ४ लक्ष ६८ हजार ३७६ महिला मतदारांची संख्या होती. त्यात ३० ऑक्टोबरपर्यंत ५ हजार ९८५ म्हण्जे जवळजवळ ६ हजार मतदार वाढले आहेत. तर पुरुष मतदारांमध्ये ४ हजार २३८ ची वाढ झाली आहे. इतर मतदारांमध्ये कोणताही बदल झाला नसून ते १० आहेत. तसेच मतदान केंद्रसंख्या ही १०१५ असल्याचे दिसून येते.

९२-वसमत विधानसभा मतदारसंघात १ लक्ष ६३ हजार ६१३ मध्ये १३१८ पुरुष मतदारांची वाढ झाली असून, १ लक्ष ६४ हजार ९३१ एवढे पुरुष मतदार झाले आहेत. तर महिला मतदारांमध्ये १ लक्ष ५३ हजार ८७२ वरून १ लक्ष ५५ हजार ८२८ म्हणजे १९५६ स्त्री मतदार वाढले असून आता ३ लक्ष २० हजार ७६५ मतदार वसमत विधानसभेला मतदानाचा हक्क बजावू शकणार आहेत.

९३ -कळमनुरी विधानासभा मतदारसंघात तब्बल ४ हजार मतदार वाढले असून, यामध्ये १७०२ पुरुष मतदारांमध्ये वाढ झाली आहे. ३० ऑगस्टपर्यंत या मतदारसंघात १ लक्ष ७० हजार २३५ होते तर आता १ लक्ष ७१ हजार ९३७ झाले आहेत. तर स्त्री मतदारांमध्ये २ हजार २९८ निव्वळ वाढ झाली आहे. ३० ऑगस्टपर्यंत १ लक्ष ५६ हजार ४४९ स्त्री मतदारसंख्या होती त्यात वाढ होऊन आता १ लक्ष ५८ हजार ७४७ झाले आहेत. तर कळमनुरी विधानसभा मतदारसंघात या निवडणुकीत ३ लक्ष ३० हजार ६८६ इतकी झाली असून, ३४५ मतदान केंद्रांच्या माध्यमातून मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

तसेच ९४- हिंगोली विधानसभा मतदारसंघामध्ये २ हजार ९४९ इतकी मतदारसंख्या वाढली असून, या निवडणुकीमध्ये ३ लक्ष ३३ हजार ३१३ स्त्री-पुरुष मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. या मतदारसंघात ३० ऑगस्टपर्यंत १ लक्ष ७२ हजार ३०७ पुरुष तर १ लक्ष ५८ हजार ५५ स्त्री मतदार होत्या. त्यामध्ये ३० ऑक्टोबरपर्यंत वाढू होऊन अनुक्रमे १ लक्ष ७३ हजार ५२५ पुरुष तर १ लक्ष ५९ हजार ७८६ स्त्री मतदार नोंदविले गेले आहेत. यामध्ये १२१८ पुरुष आणि १७३१ स्त्री मतदारांची निव्वळ वाढ नोंदवली गेली असून, ३४३ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

जिल्ह्यात तिनही मतदारसंघात एकूण ५ लक्ष १० हजार ३९३ पुरुष तर ४ लक्ष ७४ हजार ३६१ स्त्री मतदार असून, इतर मतदार कायम (१०) आहेत. जिल्ह्यात ९२-वसमत ३ लक्ष २० हजार ७६५, ९३-कळमनुरी ३ लक्ष ३० हजार ६८६ आणि ९४- हिंगोली विधानसभा मतदारसंघात ३ लक्ष ३३ हजार ३१३ असे एकूण ९ लक्ष ८४ हजार ७६४ मतदार विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून लोकशाही मजबूत करण्यास हातभार लावू शकणार आहेत.

## अग्रलेख...

# अपेक्षांचे दिवे उजळले...

आता हे स्पष्ट झाले आहे की, भारताची सांस्कृतिक अस्मिताचिन्हे म्हणून हजारो वर्षांपासून या देशातील जनतेने मनातील श्रद्धास्थानात पूजिलेल्या अयोध्या, काशी, मथुरा या प्राचीन नगरींना पुनर्वैभव प्राप्त करून देण्याच्या प्रयत्नांत सत्ताधारी भाजपाचा कोणताही राजकीय हेतू किंवा स्वार्थ नाही. अन्यथा, अयोध्येमध्ये प्रभू रामचंद्रांचे भव्य मंदिर उभारून लाखो देशवासीयांच्या पिढ्यापिढ्यांपासून उराशी जपलेल्या स्वप्नाची पूर्तता केल्यानंतर निवडणुकांसारख्या राजकीय लाभासाठी या कर्तव्यपूर्तीचा डिंडिम अधिक जोराने वाजवून केवळ अयोध्येतीलच नव्हे, तर तमाम देशवासीयांची मने मतांकरिता अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न केवळ एक कलमी कार्यक्रम राबविणे सत्ताधाऱ्यांस अवघड नव्हते. लोकसभेच्या निवडणुकीत तसे झाल्याचे दिसले नाही. अयोध्येतील राम मंदिराची उभारणी हा केवळ एका शहराच्या रोजगाराभिमुख विकासाचा मुद्दा नव्हता, तर हजारो वर्षांपासून उपेक्षित असलेल्या प्रभू रामचंद्रांच्या जन्मस्थानाचा उद्धार करण्याच्या ऐतिहासिक जबाबदारीचा तो मुद्दा होता. राम मंदिराचा मुद्दा राजकारणाच्या व धार्मिक वादाच्या केंद्रस्थानी आल्यानंतर त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून सत्ताधारी काँग्रेसने या मुद्यावर भूमिका घेणे टाळल्याचेच दिसून आले. प्रभू श्रीराम हे काल्पनिक कथेच्या नायकाचे पात्र असून अशी कोणी व्यक्ती जन्मालाच आलेली नाही, अशी भूमिका शपथपत्राद्वारे घेण्यापर्यंतची काँग्रेसी मानसिकता जगासमोर उघड झाली, तेव्हा काही विशिष्ट समूहांच्या धार्मिक भावनांना धक्का न लावण्याचा सावध पवित्रा काँग्रेस वारंवार घेत असल्याचे स्पष्ट झाले होते. आता अयोध्येत प्रभू रामांचे भव्य मंदिर उभे राहिले आहे आणि राजकारणाशी या मंदिराचा कोणताही संबंध नाही हेदेखील स्पष्ट झाले आहे. या देशातील जनतेने राम मंदिराचे स्वप्न पाहिले, त्यांनी मतांच्या मोबदल्यात मंदिराची कधी अपेक्षा केली नव्हती. राम मंदिर हा केवळ भारताचा सांस्कृतिक ठेवा आहे आणि हजारो वर्षांच्या परकी आक्रमणानंतरही जनतेने मनाशी आणि उराशी जपलेल्या या ठेव्याचा जीर्णोद्धार व्हावयास हवा, ही प्रत्येक भारतीयाची भावना होती. हीच भावना प्रत्येक पिढीने आपल्या पुढच्या पिढीच्या मनात बिंबविली आणि त्यामुळेच शेकडो वर्षे राम जन्मभूमीवर मंदिर उभे करण्याचे स्वप्न या देशाने जिवंत ठेवले. इसवी सन १५२८ मध्ये या संघर्षाचा प्रारंभ झाला आणि २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालानंतर, म्हणजे तब्बल ५०० वर्षांनंतर या संघर्षाची शांततामय सांगता झाली. त्याआधीच्या सुमारे १० वर्षांपूर्वीचा इतिहास पाहता, एवढ्या सहजपणे मंदिराच्या जागेचा वाद संपुष्टात येईल, असे भाकीत कोणीही केले नसते, अशी स्थिती होती. मात्र, राष्ट्रीय अस्मितांच्या मुद्यावर धार्मिक भेदभाव विसरून सारा देश एकत्र उभा राहतो, हे या निमित्ताने जगाने अनुभवले. राम मंदिराच्या उभारणीनंतर प्रथमच, बुधवारी अयोध्येच्या रामकथा उद्यानात पहिला दीपोत्सव साजरा झाला. अभूतपूर्व अशा उत्साहाने या उत्सवात सहभागी झालेली गर्दी मतदारांची नव्हती, तर भाविकांची होती आणि स्वप्नपूर्तीच्या आनंदाने या गर्दीच्या मनामनांत आनंदाची दिवाळी साजरी होत होती. अयोध्या ही मनुनिर्मित नगरी असल्याचे म्हटले जाते. अशी पुरातन शहरे जेथे वसलेली असतात, तो प्रदेश म्हणजे देशाची सांस्कृतिक पुण्यभूमी मानला जातो. म्हणूनच उत्तरप्रदेशाचा या पुण्यभूमीचा वारसा जपण्याचा वसा घेतलेल्या सरकारने तेथील गुन्हेगारी, अनैतिक धंदे समूळ उखडून टाकण्याचा सपाटा लावला असावा. उत्तरप्रदेशाची उभ्या देशातच नव्हे, तर संपूर्ण जगात उत्तम प्रदेश अशी ओळख निर्माण व्हावी, ही राज्यकर्त्यांची जुनीच इच्छा आहे. पण कृतीची जोड दिल्याखेरीज इच्छापूर्तीचे समाधान मिळविता येत नसल्याने उत्तरप्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारने उत्तम प्रदेशाच्या निर्मितीचा ध्यास घेतला आणि बाहुबलींच्या गुन्हेगारी विश्वाचे राज्यावरील सावट संपूर्ण दूर करण्यासाठी ताकदीने कठोर पावले उचलली. एकेकाळी या राज्यात काही जनसमूहांस ताठ मानेने चालण्याची परवानगी नव्हती; अशा दहशतीखाली हे समूह वावरत होते. तेथे आता त्यांच्या जगण्यास आत्मविश्वासाची जोड मिळाली आहे, ही उत्तरप्रदेशाच्या परिवर्तनाची पहिली पायरी असल्याचे सांगितले जाते. यामुळेच अयोध्या मात्र हे तर केवळ सुरुवात आहे; काशी, मथुरा अजूनही बाकी आहे, या भावनेशी आजही सांस्कृतिक अस्मितेचे हळवेपण जोडले गेलेले आहे. राम मंदिराची उभारणी झाल्यानंतर या देशातील अशी सारी अस्मिताचिन्हे पूर्वीच्या वैभवाने पुन्हा दिमाखात मिरविण्यास सिद्ध व्हावीत, या अपेक्षा आता उंचावल्या आहेत आणि सुदैवाने राज्यकर्त्यांना या सामाजिक अपेक्षांचे नेमके भान आहे, ही त्यातील समाधानाची बाब ठरली आहे. म्हणूनच अगदी अलिकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका जाहीर संवाद सभेत जनतेच्या भावनेस सुखावणारे केवळ काही संकेत दिले, तेव्हा या अपेक्षा पुन्हा एकदा नव्या उमेदीने उंचावल्या आहेत. रामकथा उद्यानात उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी याच अपेक्षांचा थेट पुनरुच्चार केला, तेव्हा उभ्या देशाची दिवाळी खऱ्या अर्थाने आनंदाने उजळली. एक बाब मान्य केली पाहिजे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्याचा वारंवार उल्लेख करतात, ते डबल इंजिन सरकार अस्तित्वात असेल तर कोणत्याही प्रादेशिक, राष्ट्रीय समस्यांचा गुंता सोडविणे सोपे होते, हे अयोध्या वादाने सिद्ध केले आहे. केंद्रात मोदी सरकार आणि उत्तरप्रदेशात योगी सरकार यांनी हातात हात घालून अयोध्येतील मंदिराच्या उभारणीकरिता केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांमुळेच हा वाद सामंजस्याने सोडविणे शक्य झाले. आता ज्या काशी, मथुरेच्या मुक्तीची भारतीय समाजास प्रतीक्षा आहे, ते वादही अशाच सामंजस्याने सोडविले जातील, अशी भावना वाढीस लागली आहे. रामकथा मैदानातील दीपोत्सवादरम्यान योगी आदित्यनाथ यांनी काशी, मथुरेच्या मुद्याला भावनिक स्पर्श केला. कारण, देशातील सांस्कृतिक अस्मिताचिन्हांची जोपासना झाली पाहिजे, ही केवळ राज्यकर्त्यांची पक्षाची नव्हे, तर तमाम जनतेची प्रामाणिक इच्छा आहे. लोकसभेच्या निवडणुकीत अयोध्या मतदारसंघात भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराचा पराभव झाला, ही खंत राजकीय पक्ष म्हणून या नेत्यांच्या मनात असू शकते. ते साहजिकही आहे. पण त्यामुळे अयोध्येच्या विकासाचा वारू वाऱ्यावर सोडला गेलेला नाही, ही बाब अधोरेखित करावयास हवी. उत्सवी सोहळ्यात योगी आदित्यनाथ यांनी सीतेच्या अग्निपरीक्षेचा संदर्भही दाखल्या दाखल दिला. सीतेलाही आपले पावित्र्य सिद्ध करण्यासाठी अग्निदिव्य पार पाडावे लागले होते. त्यामुळे अयोध्येतील निवडणुकीमधील पराभव ही या नेत्यांची अग्निपरीक्षा असावी, असाच त्यांच्या वक्तव्याचा संदर्भ असावा. पण वारंवार अग्निपरीक्षा द्यावी लागू नये, ही अपेक्षा त्यांच्या राजकीय दुर्दम्य विश्वासाचा पुरावा ठरते. काशी-मथुरेच्या विकासाबाबतचे पंतप्रधानांचे संकेत आणि योगी आदित्यनाथांचे सूचक वक्तव्य म्हणजे, डबल इंजिन सरकारची पुढच्या वाटचालीची दिशा स्पष्ट करणारे आहेत. भविष्यात अयोध्येप्रमाणे काशी, मथुरेचाही विकास होणार ही या नेत्यांची महत्त्वाकांक्षा आहेच; पण या संघर्षाची सांगतादेखील सामंजस्यानेच व्हावी, अशी रणनीती अयोध्येच्या उदाहरणाने आखून दिलेली आहे. आपले ध्येय साध्य करण्याकरिता पावले टाकताना, उद्दिष्टापासून विचलित होऊ नये, हा संदेश अयोध्येच्या संघर्षाने दिला आहे आणि या ध्येयप्राप्तीच्या संघर्षात विचलित झाले नाही तर सफलता प्राप्त होतेच, हेदेखील स्पष्ट झाले आहे. सात-आठ वर्षांपूर्वी ज्या अयोध्येत साधी वीज पुरेशी पोहोचली नव्हती, रस्ते, नदीचे घाट आणि मठ-मंदिरे दुरवस्थेने ग्रासलेली होती आणि त्यामुळे आपल्या सांस्कृतिक वारशाविषयीच्या आत्मीयतेवरच प्रश्नचिन्हे उमटविली गेली होती, त्या अयोध्येत आता चारपदरी रस्ते झाले आहेत, ३१ हजार कोटींच्या विविध विकास योजनांची प्रक्रिया सुरू झाली आहे. विमानतळ, रेल्वेसारख्या सुविधा झाल्या आहेत. ही केवळ सांस्कृतिक वारशाच्या पुनरुज्जीवनाची प्रक्रिया काशी-मथुरेच्या दिशेने वाटचाल करणार, यात आता फारशी शंका राहिलेली नाही. संपूर्ण कायापालट झालेली झगमगती अयोध्या नगरी आज उभ्या जगाचा आकर्षणबिंदू ठरली आहे. म्हणूनच काशी-मथुरेच्या कायापालटाचे स्वप्न नव्या उमेदीने उभारी घेत खुणावू लागले आहे. सर्वांना सोबत घेऊन वाटचाल केल्यास विकासाचा मार्ग विस्तारता येतो, हे दाखविण्याची नवी संधी सत्ताधाऱ्यांना खुणावते आहे. ▮

## जीवन जिज्ञासा

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

# महाभारत ते भारत (७)

महाभारत हा महान ग्रंथ आहे. महर्षी व्यासांच्या दिव्य प्रतिभेतून निर्माण झालेले हे महाकाव्य म्हणजे भारतीय संस्कृतीचा ज्ञानकोशच आहे. त्यात मानवी जीवनाशी संलग्न असलेले सर्व विषय आले आहेत. वैदिक काळापासून भारतात निर्माण झालेल्या तत्त्वज्ञानाचे एकत्रिकरण करणारी सर्व संग्राहक गीता ही महाभारतामुळे संपूर्ण जगाला मिळाली. त्या गीतोक्त तत्त्वज्ञानाने वॉरन हेस्टिंग्ज, शौपेनहोमरपासून तो आधुनिक काळातील भारताचे राष्ट्रपतिपद भूषविणारे ए. पी. जे. अब्दुल कलाम आदी अनेक मान्यवरांपर्यंत अनेकांना अक्षरशः मोहिनी घातली आहे. फ्रान्सचे पंतप्रधान द गोल यांनी तर असे विधान केले होते की, 'ज्यावेळी मला व्यक्तिगत स्तरावर काही समस्या निर्माण होतात किंवा राष्ट्रप्रमुख म्हणून निर्णयाच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय स्तरावर संभ्रम निर्माण होतो, त्यावेळी मी भगवद्गीतेचा आधार घेतो. त्यातील वैचारिक सूत्रांचे चिंतन, मनन करतो आणि निर्णय घेतो. प्रत्यक्षात माझे ते निर्णय योग्य आणि अचूक ठरल्याची माझी अनुभूती आहे.' (मान्यवरांच्या दृष्टीतून गीता) भारताबाहेरच्या, एका वेगळ्या संस्कृतीत, धर्मात जन्माला आलेल्या, आधुनिक युगातील एका उच्चपदस्थ आणि एका देशाचे नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीचा हा शरणागत भाव आणि कुरुक्षेत्रावर संभ्रमित होऊन, विविध संभ्रमाने गोंधळून, मन विचलित झालेल्या अर्जुनाने श्रीकृष्णाला शरणागत भावाने- 'यत् श्रेयः स्यात निश्चित ब्रूहि तत् मे' अशी केलेली प्रार्थना आणि शेवटी 'नष्टः मोहः स्मृतिः लब्धा' आणि 'करिष्ये वचनं तव' ही त्याची अनुभूती! यात युगायुगाचे प्रदीर्घ अंतर असले, तरी अनुभूतीचा स्तर एकच आहे. या दृष्टीने गीतेचे तत्त्वज्ञान हे कालातीत आहे. त्याचमुळे ज्ञानेश्वर माउलीने म्हटल्याप्रमाणे गीताही नित्य नूतन अशी आहे.

महाभारतकार चिं. वि. वैद्य म्हणतात त्याप्रमाणे महाभारत म्हणजे राजनीतीच्या, राजकारणातील विविध प्रकारांच्या ज्ञानाची खाणच आहे. त्यांत शुक्रनीती आहे, बृहस्पती नीती, कामंदकीय राजनीती, कणिक नीती, शांतिपर्वात भीष्मांनी युधिष्ठिराला सांगितलेली राजनीती आणि कुरुवंशाच्या हस्तिनापूरच्या महाराज्याचा महामंत्री म्हणून कार्यरत असलेल्या विदुराची 'विदुर नीती' आहे. या दृष्टीने महाभारत म्हणजे राज्यव्यवहार कोशच म्हणावा लागेल. त्यांतील राजकारणाची सूत्रे आजही तितक्याच प्रगल्भतेने वापरता येऊ शकतात. परिस्थितीचा संदर्भ बदललेला असला, तरी मूळ सूत्र अद्याप आचरणीय आहे. स्वीकारणीयच आहेत. जगाच्या धकाधकीच्या मामल्यात आपला देश, धर्म, समाज, संस्कृतीचे रक्षण कसे करावे, या संबंधातील आणि धृतराष्ट्री मनोवृत्तीच्या लोकांशी 'जशास तसे' या न्यायाने कसे वागावे? या बाबतीतील चिरंतन स्वरूपाचे मार्गदर्शन महाभारताने केले आहे. त्याचा महत्त्वाच्या सूत्रांद्वारे परिचय करून घेऊ.

**शत्रूशी कसे वागावे?**

एकदा शत्रुनाशाच्या कामाला आरंभ केल्यानंतर ते पूर्णत्वाला गेल्याशिवाय थांबू नये. कारण कांटा जर अर्धवट तोडून टाकला तर तो पुष्कळ काळपर्यंत स्राव करणारी जखम उत्पन्न करतो. ठार केलेल्या शत्रूपासून भय उत्पन्न होत नाही आणि काळजीचे कारणही उरत नाही. पूर्वी ज्याने आपल्याला पीडा दिली असेल त्याला दमाने मारावे. त्याचा सूड घ्यावा. कारण वृक्षाचे मूळ तोडल्यावर त्याच्या फांद्या कशा जिवंत राहतील? शत्रूवर कधीही दया करू नये. पीडा करणाऱ्या शत्रूचा समूळ नायनाटच करावा. शत्रू लहान म्हणून त्याची उपेक्षा केली तर तो ताडाप्रमाणे मूळ धरतो आणि गर्द अरण्यात पडलेल्या बीजाप्रमाणे लवकरच मोठा होतो. अग्नीची लहानशी ठिणगी जशी तिला इंधनादिकांची साथ मिळाल्याबरोबर प्रचंड आगीत रूपांतरित होते, त्याप्रमाणे तो शत्रूदेखील आपल्यासारखे अनेक मिळवून, शक्ती संचय करून आपल्याला त्रासदायक ठरतो... (इंडिया महाआघाडी). वस्तऱ्याप्रमाणे तीक्ष्ण होऊन शत्रूच्या प्राणांचे हरण करावे. त्याच्या पडत्या काळात त्याला धार लावावी आणि वस्तरा केस जसे काढतो त्याप्रमाणे शत्रूंना कापून काढावे. (आदिपर्व- अ. क्र. १४० मधून)

वरील काही मोजक्या राजधर्माशी वा शत्रू-मित्र विवेकाशी संबंधित उपदेश सूत्रांच्या ऐतिहासिक वाटचालीचा विचार केला तर स्पष्टपणे लक्षात येते की, महाभारतातील या कूटनीती सूत्रांचा अवलंब आमच्या शत्रूनेच केला आहे. त्यामुळे ते यशस्वी झाले आणि आम्ही पराभूत झालो. अपवादस्वरूप छत्रपती शिवरायांनी वरील कूटनीतीचा योग्य वापर करून हिंदुस्तानचे 'दारूल इस्लाम' आजच्या परिभाषेत 'गजवा-ए-हिंदुस्तान' करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या आदिलशाही, निजामशाही, मोगलशाही या जिहादी ताकदींशी यशस्वी लढा दिला आणि महाराष्ट्रापुरता का होईना, एक हजार वर्षांचा 'जिहाद' फक्त २८ वर्षांच्या अल्पकाळात (तोरणा ते रायगडावरील हिंदवी स्वराज्याची स्थापना सन १६४६ से १६७४) संपवून टाकला. म्लेच्छांचे बहुता दिसांचे माजलेले बंडाचे समूळ निर्दालन करून 'आनंदवनभुवना'ची स्थापना केली. पण पुढच्या काळात आम्ही महाभारत विसरलो, त्यातील मार्गदर्शन विसरलो. भलत्याच सद्गुण-विकृतीने पछाडलो. त्याचा परिणाम म्हणजे भरतवंशीयांच्या म्हणजे हिंदूंच्या नशिबी पांडवांसारखा वनवासच आला आहे. अद्याप तो संपलेला नाही. जोपर्यंत हिंदू समाज याचा मूलतः विचार करून संघटितपणे महाभारताचे खरे वारसदार म्हणून उभे राहत नाही, तोपर्यंत अस्थिरता आणि भयगंडांतून त्यांची मुक्तता होऊच शकत नाही, हे विदारक सत्य हिंदू समाजाच्या भाळी नियतीने जणू लिहून ठेवले आहे. हिंदू समाजालाच याचे कठोर आत्मपरीक्षण करावे लागेल. तो जोपर्यंत हे करीत नाही अन् संघटित होऊन प्रतिकाराला सिद्ध होत नाही तोपर्यंत महाभारतात उपदेश केल्याप्रमाणे एखादा अफझल, इकबाल, सय्यद, महमूद त्यांच्या वस्तऱ्यांना, त्यांचे शत्रू म्हणजे 'काफर' असलेल्या हिंदूंचे 'सर तनसे जुदा' करण्यासाठी तीक्ष्ण धार लावतच राहणार आहेत.

'विचार कुणी करायचा?'

'काळपुरुष' कळवळून हा जीवघेणा प्रश्न हिंदू समाजाला विचारतो आहे. ▮

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**संजय रामगिरवार**

# महत्त्वाकांक्षेची बंडखोरी अन् बंडखोरीची महत्त्वाकांक्षा!

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत अगदी साऱ्याच राजकीय पक्षांत मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाली आहे. खरे तर, ही बंडखोरी दोन पद्धतीची आहे. एक पक्षांतर्गत आणि दुसरी आघाडी किंवा युतीतील बंडखोरी! विधानसभेच्या एका जागेसाठी एकाच वेळी पक्षातील आणि युती किंवा आघाडीतील अनेक नेते उत्सुक होते. त्या सर्वांनी आपली दावेदारी रेटली. पण जागा एकच असल्याने कुणा एकालाच त्या जागेवर पक्षाची अधिकृत उमेदवारी मिळाली. उर्वरितांनी मात्र पक्षाच्या किंवा युती व आघाडी धर्माचा विचार न करता आपापले नामांकन दाखल केले. हा प्रकार यंदा खूपच मोठ्या प्रमाणात पुढे आला. कारण एव्हाना सर्वांनाच आमदार व्हायचे आहे. अगदी छुटपुट नेतासुद्धा पुढे येतो आणि आपण आमदार होणारच, अशी भीष्म प्रतीक्षा घेऊन कामाला लागतो. त्यासाठी आवश्यक पैसा त्यांनी आडमार्गाने कमावला असतोच. त्यामुळे आपल्याला आता कुणीही रोखू शकत नाही, असा त्याचा समज होतो.

अशा बंडोबांना शांत करण्यासाठी जवळजवळ सारेच पक्ष सध्या प्रचार सोडून याच कामाला लागले आहेत. भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांची तासन्तास खलबते सुरू आहेत तर काँग्रेस पक्षाने, बंडखोरांनी उमेदवारी मागे घेतली नाही तर पक्षातून हकालपट्टी करू, अशी धमकी दिली आहे. मविआत कुठेही मैत्री पूर्ण लढती होणार नाहीत, असे आश्वासन आपल्या घटक पक्षांना काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी जाहीरपणे देत आहेत. ज्यांना उमेदवारी मिळाली नाही अशी काही नेतेमंडळी अक्षरशः ढसाढसा रडत असल्याच्या चित्रफिती प्रसारित होत आहे. काय चालले कळायला मार्ग नाही. साऱ्यांच्याच महत्त्वाकांक्षेची कमाल आहे.



आमदार कशासाठी व्हायचे, याचे अवघे समीकरणच बदलून गेले आहे. आमदार होऊन आपल्या मतदार संघातील जनतेची सेवा करणे, क्षेत्राचा विकास घडवून आणणे हा प्रकार केव्हाच मागे पडला आहे. आता आमदार झाले की आलिशान गाडी, बंगला, मोठ्ठे बँक बॅलन्स आणि कायम गलेलठ्ठ पैसा येत राहावा, अशी कुठली तरी ठेकेदारी किंवा भागीदारी मिळते आणि आपली पुढची जिंदगी ऐशोआरामात जाते, अशी धारणा झाली आहे आणि ती आजच्या राजकीय परिस्थितीत खरीही आहे. कारण जी प्रस्थापित नेतेमंडळी आहे, त्यांच्याकडे बघून नव्याने राजकारणात येणाऱ्याचा असा समज होणे अगदी स्वाभाविक आहे.

पक्षाची अधिकृत उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष म्हणून अर्ज दाखल करून निवडणुकीच्या निकालावर प्रतिकूल परिणाम करण्याची क्षमता असलेल्या या बंडखोरांनी मात्र निवडणुकीतून माघार घ्यावी यासाठी आता त्यांची मनधरणी सुरू आहे. अशा प्रभावशाली बंडखोरांना शांत करण्यासाठी विधान परिषद, राज्यसभेचे सदस्यत्व, शासकीय मंडळांवर वर्णी लावण्याचे आश्वासनही दिले जात आहेत.

याची दुसरी बाजूही समजून घेतली पाहिजे. ठिकठिकाणी प्रस्थापित नावांचे राज्य चालले आहे, हेही तेवढेच खरे आहे. मजल-दर-मजल निवडणुका जिंकत आलेल्या बड्या नेत्यांचे मतदारसंघ जणू त्यांची जागीर झाली आहे. कितीतरी टर्म सातत्याने तेच नेते किंवा मग त्यांच्याच परिवारातील सदस्य तेथून निवडून येत आहेत. कधी कधी तर असे वाटते की, लोकशाही राहिली कुठे ही तर एका परिवाराची राजेशाहीच आहे. अशा राजेशाहीचा आधी हेवा आणि कालांतराने त्याचा द्वेष करणारे दुसऱ्या फळीचे नेते मग बंडखोरीचे शस्त्र उगारतात आणि आपल्या पदरात काहीतरी पाडून घेतात. निवडणुकीचे राजकारण असेच काहीसे झाले आहे.

निवडून आलेल्या नेत्यांना आपण लोकप्रतिनिधी आहोत. लोकप्रतिनिधी हे बदलतही असतात, हे मान्य करायला ते अजिबात तयार नाहीत. लोकांचे भले करण्याच्या नावावर त्यांच्याच परिवाराचे चांगभलं होत आहे. प्रत्येक निवडणुकीच्या अर्जासोबतचे त्यांचे संपत्तीचे विवरण बघितले तर पाच वर्षांत कितीतरी पटीने त्यांची संपत्ती वाढलेली दिसेल आणि हो, ही संपत्ती त्यांच्या खऱ्या संपत्तीचा अगदी काही अंश असतो, हेही लोकांपासून लपून राहत नाही. तरीही आम्ही सर्वसामान्य जनता जगातल्या सर्वात मोठ्या आणि प्रगल्भ लोकशाहीचे गोडवे गात असतो, गात राहणार आहोत... ▮

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# चाणक्याने लावला टाईमबॉम्ब

महाराष्ट्रात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली. आठ हजार अर्ज आले आहेत. ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येईल. म्हणजे या निवडणुकीचे नेमके चित्र ४ नोव्हेंबरला स्पष्ट होईल. दर निवडणुकीत जागावाटप आणि उमेदवारांच्या याद्यांचा घोळ चालतो. मात्र, यावेळी अधिक त्रास आहे. त्याला कारण आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी हे दोन पक्ष फुटल्यानंतरची ही पहिली निवडणूक आहे. गेल्या वेळी एकमेकांच्या विरोधात लढणारे यावेळी महायुती किंवा महाआघाडीमध्ये वाटले गेले आहेत. आधी 'एक पक्ष, एक तिकीट' असे समीकरण होते. आता युती-आघाडी झाल्याने एकेका तिकिटासाठी तिघे-तिघे झाले आहेत. याशिवाय वंचित आघाडी, राज ठाकरेंची मनसे, बसपा, डझनभर लहानसहान पक्ष, ढिगाने अपक्ष हवसे-नवसे-गवसे अशी मोठी गर्दी आहे. बंडोबाही मोठ्या संख्येने आहेत. या सर्वांना जनतेची सेवा करायची आहे, पण जनतेची सेवा करायला तिकीट कशाला लागते? या प्रश्नाचे उत्तर इच्छुकांकडे नसते. निवडणूक हा लोकशाहीतला एक उत्सव आहे. २० नोव्हेंबरला निवडणूक आणि २३ नोव्हेंबरला निकाल आहे. म्हणजे महिनाभर खूप गमतीजमती, आरोप-प्रत्यारोप पाहायला आणि ऐकायला मिळणार.

आपल्याकडे एकूण २८८ जागा आहेत. बहुमतासाठी किमान १४५ जागा जिंकायला हव्या. जास्त जागा लढेल त्याला जास्त जागा जिंकण्याची शक्यता वाढते. जागावाटपाचा घोळ पाहायला मिळतो तो यासाठीच. यावेळी महायुतीत भाजपा १४८ जागा लढवतो आहे. याशिवाय शिवसेनेकडे भाजपाने आपले आठ उमेदवार पाठवले आहेत. अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नावावर भाजपाचे चौघे उभे केले आहेत. ते सारे धरले तर भाजपाचे एकूण १६० उमेदवार यावेळी मैदानात दिसतील. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या वाट्याला ८० जागा तर अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ४५ जागा लढायला मिळाल्या आहेत. थोडक्यात महायुतीत भाजपाच मोठा भाऊ आहे. महाआघाडीने ९०-९०-९० चा फॉर्म्युला ठरवला. पण काँग्रेसने शंभरावर जागा जाहीर करून मॅच जिंकल्याचा ताव आणला. मात्र, सारे गोलमाल आहे. उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलेल्या पहिल्याच यादीने घोळ करून ठेवला आहे. काँग्रेस आणि मित्रपक्षांच्या जागांवर ठाकरेंनी आपले उमेदवार जाहीर केले. येथूनच वाद पेटला. तो अजूनही धुमसतो आहे. मित्रपक्षांच्या जागेवर अदलाबदली करण्याची धडपड सुरू आहे. मात्र, आता अवघड आहे. उद्धव ठाकरे स्वतःला महाआघाडीच्या मुख्यमंत्रिपदाचा चेहरा होऊ पाहत होते; पण त्यांची वागणूक आघाडीचा चेहरा बिघडवण्याचीच राहिली. रामटेक ही काँग्रेसची जागा. ठाकरेंनी तिथे विशाल बरबटे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे नागपूर जिल्ह्याचे काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी मंत्री राजेंद्र मुळक यांनी बंडखोरी केली आहे. मुळक यांच्या बंडखोरीला स्थानिक काँग्रेस नेत्यांनी समर्थन केले आहे. खासदार श्याम बर्वे, सुनील केदार हे नेते मुळक यांच्या रॅलीत होते. १० वर्षांपासून रामटेकच्या प्रतीक्षेत असलेल्या मुळक यांनी



मुंबई-दिल्लीच्या खूप वाऱ्या केल्या. उपयोग झाला नाही तेव्हा त्यांनी बंडाचे हत्यार उपसले. या बंडाने महाआघाडीची महाबिघाडी करून ठेवली. निष्ठावान कार्यकर्त्यांनी किती वाट पाहायची, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. नागपुरातच नव्हे तर संपूर्ण विदर्भात बंडाचे वारे जबरदस्त आहे. विशाल बरबटे हा नवा चेहरा ठाकरे सेनेने दिला आहे. ठाकरेंचे तर सोडा, काँग्रेसकडेही आता तगडे कार्यकर्ते उरले नाहीत. जिल्हा बँक घोटाळ्यात दोषी ठरल्याने काँग्रेसचे सावनेरचे ज्येष्ठ नेते सुनील केदार यावेळी निवडणूक लढवू शकत नाहीत. त्यामुळेच की काय त्यांनी आपल्या पत्नीला उभे केले आहे. तब्बल २५ वर्षे सावनेरवर केदार घराणे एकछत्री हुकूमत गाजवत आले. एक कार्यकर्ता तयार करता आला नाही. तीच अवस्था काटोलमध्ये आहे. काटोल म्हणजे अनिल देशमुख. फडणवीसांवर राग काढण्यासाठी अनिलबाबू पुस्तक लिहितात. पण नागपूर दक्षिण-पश्चिमच्या मैदानात फडणवीसांशी 'पंजा' लढवायची त्यांना हिंमत होत नाही. काँग्रेस की राष्ट्रवादी, घरची शेती झाली आहे. लढता येत नाही? दे बायकोला तिकीट. लढायचे नाही? दे पोराला तिकीट. या नेत्यांनी पार्ट्या घरच्या दावणीला बांधल्या आहेत. या पृष्ठभूमीवर देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व झळाळून उठते.

सत्तेचा हायवे विदर्भातून जातो. विदर्भात विधानसभेच्या तब्बल ६२ जागा आहेत. विदर्भात भरघोस जागांची कमाई करणाऱ्या राजकीय पक्षाला सत्तेत येण्यापासून कोणी रोखू शकत नाही. गेली निवडणूक भाजपा-शिवसेना युतीने मिळून लढवली होती. जनतेने युतीच्या बाजूने स्पष्ट कौल दिला होता. पण उद्धव ठाकरे यांची मुख्यमंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा आड आली. शरद पवारांनी ठाकरेंची दुखरी नस हेरली. ठाकरे मोहात गेले नसते तर आज दिसतो, दिसला तसा राजकारणाचा तमाशा झाला नसता. उद्धव यांच्या स्वार्थापायी शिवसेना फुटली. उद्धव यांचे मुख्यमंत्रिपद गेले. भाजपासोबत राहिले असते तर मजेत असते. उद्धव यांचे हात आज रिकामे आहेत. 'शिल्लक शिवसेने'चे ते प्रमुख आहेत. शरद पवारांचे एक विशेष आहे. चुकूनही कोणी उद्या आपला प्रतिस्पर्धी होईल, असे दिसले तर पवार त्याला संपवतात. शिवसेनेचे तेच झाले आहे. उद्धव यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा व्हायचे होते. होता आले नाही. महाआघाडीमध्ये उद्धव आता कागदोपत्री उरले आहेत. पवारांनी पुढचा नंबर आपल्या पुतण्याचा लावला. अजितदादांनाही मुख्यमंत्रिपदाची स्वप्नं पडत होती. त्यासाठी त्यांनी काकाचा पक्ष फोडला तरी काका-पुतण्यातला संघर्ष थांबलेला नाही. जनतेचे प्रश्न काय आणि हे भांडताय काय? खासदारकी, आमदारकीच्या तुकड्यासाठी दोघांमध्ये एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणे सुरू आहे. बारामतीमध्ये अखेरची लढाई सुरू आहे. काकाने आपला नातू उतरवला आहे. ही निवडणूक पवार विरुद्ध पवार अशी आहे. ज्या भानगडी समोर येत आहेत त्या पाहिल्या तर असे दिसते की, पवार सुरुवातीपासून अजितदादांना पाण्यात पाहत होते. त्यांच्या हाती मुख्यमंत्रिपद दिले नाही. १० वर्षांपूर्वी अजितदादांच्या नावावर ७० हजार कोटी रुपयांचा घोटाळा विरोधकांनी खपवला. त्यासाठी दादांची चौकशी करायच्या फाईलीवर तेव्हाचे गृहमंत्री आबा पाटील यांनी सही केली होती, अशी धक्कादायक माहिती आता उजेडात आली आहे. शरद पवारांच्या संमतीशिवाय अशी फाईल तयार होऊच शकत नाही. मग पवारांचा काय डाव होता? काकांना तेव्हा तो खेळता आला नाही. ती कसर काका आता काढत आहेत. दोन पवारांमध्ये निवडणूक आहे. अजितदादा जिंकले तर काकाचे राजकारण संपलेच समजा. उलट निकाल लागला तर पुतण्या संपला. दादा पडले तर पळवलेला पक्ष काकाकडे परत येईल.

काय होणार या निवडणुकीत? भाजपा हॅट्ट्रिक मारणार का? नक्कीच मारणार. लोकसभेच्या वेळी होती तशी विरोधी हवा आज नाही. हवा असती तर अनिस अहमद उशिरा पोहोचले नसते. घटना बदलण्यासाठी मोदींना ४०० जागा हव्या आहेत, असला खोटा प्रचार विरोधकांनी चालवला. त्यामुळे विदर्भात भाजपाला तडाखा बसला. लोकांच्या ते लक्षात आले आहे. तसाही भाजपाच्या विरोधात सध्या कुठला 'नॅरेटिव्ह' महाआघाडीच्या हाती लागलेला नाही. आपापसात भांडणात ते भिडले आहेत. संजय राऊत यांचे नाना पटोलेंशी वाजले आहे. काका-पुतण्या एकमेकांची नक्कल करण्यात मग्न आहेत. महायुतीशी लढायला त्यांच्याकडे वेळ आणि ताकद आहे कुठे? 'चाणक्य' म्हणजे फडणवीसांनी 'टाईमबॉम्ब' लावला आहे. २३ नोव्हेंबरला तो फुटणार. त्या दिवसापासून सकाळचा भोंगा बंद होणार, शरद पवार गुगली टाकणे विसरतील. जे काही ऐकायला मिळेल तो देवेंद्र फडणवीस यांचा शंखनाद असेल. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### लक्ष्मीपूजन



लक्ष्मीपूजन भारतीय संस्कृतीतील वैशिष्ट्यपूर्ण पूजा आहे. आश्विन महिन्यातील अमावास्येला संध्याकाळी म्हणजे प्रदोषकाळी ही पूजा प्रतिवर्षी केली जाते. दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजनाला अधिक महत्त्व आहे. दिवाळीच्या अमावास्येला केरसुणीचेसुद्धा पूजन केले जाते. घरातून दारिद्र्य, अलक्ष्मी घालविण्यासाठी देवी लक्ष्मीचे षोडषोपचार पूजन केले जाते. हा दिवस दिवाळीचा सर्वात महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवशी घरोघरी देवी लक्ष्मीचे तसेच कुबेराचे पूजन केले जाते. व्यापारी लोक वहीखात्याचे पूजन करतात. आश्विन अमावास्येच्या रात्री लक्ष्मी सर्वत्र संचार करते आणि आपल्या निवासासाठी योग्य असे स्थान शोधू लागते. जेथे चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष, संयमी, धर्मनिष्ठ, देवभक्त आणि क्षमाशील पुरुष आणि पतिव्रता स्त्रिया असतात, त्या घरी वास्तव्य करणे लक्ष्मीला आवडते, अशी आख्यायिका आहे. समृद्धी आणि ऐश्वर्याचे प्रतीक असलेल्या लक्ष्मीची पूजा या रात्री केली जाते. अक्षतांनी बनवलेले अष्टदल कमल किंवा स्वस्तिक यावरच श्रीलक्ष्मीची स्थापना केली जाते. त्यानंतर लक्ष्मीला पंचामृतचा आणि गोड पदार्थाचा नैवेद्य दाखवतात. धने, गूळ, लाह्या, बत्तासे इत्यादी पदार्थ लक्ष्मीला वाहून नंतर ते आप्तेष्टांना वाटतात. याखेरीज चलनी नोटा, नाणी, सोन्याचे अलंकार यांचीही पूजा यावेळी केली जाते. पूजेच्या वेळी फटाके उडवून आनंद साजरा केला जातो. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्रीविष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांना बळीच्या कारागृहातून मुक्त केले, अशी कथा आहे.

**शंकर कुळकर्णी**/९७६४४६५५७०

●● ●●

### भाऊबीजेनिमित्त...

भाऊबीज हा दिवस एकाच मातेच्या गर्भातून जन्म घेतलेल्या जीवांना एकमेकांशी वाटणारा जिव्हाळा म्हणजे प्रेम व्यक्त करण्याचा दिवस आहे. या दिवशी बहीण आपल्या भावासाठी श्री यमाईदेवीकडे जे काही मागणे मागते त्याप्रमाणे तिच्यामध्ये असलेल्या भावानुसार भावाला त्याचे फळ मिळत असते. त्यामुळे तिचे भावाशी असलेले देवाण-घेवाण हिशेब काही प्रमाणात कमी होतात. या दिवशी स्त्रीमध्ये असलेले देवीतत्त्व जागृत होते आणि त्याचा भावाला लाभ होतो. या दिवशी यम त्याची बहीण यमुना हिच्या घरी जेवायला जातो म्हणून या दिवसाला 'यमद्वितीया' असे म्हणतात. यम आणि यमुना ही सूर्यदेवाची मुले आहेत. यम ही मृत्यू आणि धर्म याची देवता आहे. एक दिवस प्रत्येकालाच मृत्यू येणार आहे, याची जाणीव आपण ठेवली तर आपल्याकडून वाईट कृत्य किंवा पैशाचा चुकीचा वापर होणार नाही. या दिवशी यमाप्रीत्यर्थ १३ दिवे लावून 'यमदीपदान' करून यमदेवतेला प्रार्थना करावी की, हे यमा, या दिव्याप्रमाणे आम्ही सतर्क आणि जागृत आहोत. प्रकाशाचे प्रतीक असलेला हा दीप आम्ही तुला अर्पण करत आहोत, त्याचा स्वीकार कर. धर्माचरणी आणि साधना करणाऱ्या जीवांनी केलेल्या या प्रार्थनेमुळे यमदेवतेचा कृपाशीर्वाद मिळतो.

**वैशाली घाडगे**/नागपूर

## वाचक पत्रे

### आनंद वाटू या...

'दिवाळी सण मोठा, नाही आनंदाला तोटा...' असे आपण म्हणतो. गुलाबी थंडीच्या वातावरणात सर्वत्र उत्सवाचे वातावरण संचारले असते. दुसरीकडे आपण आनंदाच्या भरात वातावरण प्रदूषित तर करत नाही ना, असा प्रश्न निर्माण होतो आहे.

विशेषतः फटाके उडविल्याने धूर, हवा, पाणी प्रदूषित होताना दिसत आहे. त्याचबरोबर आवाजाचे प्रदूषण आहे. याचा गंभीर परिणाम मानवी जीवनावर होत आहे. आवाजाचे तथा बिगर आवाजाचे फटाके, अनार, फुलझडी, भुईचक्र यापासून मोठ्या प्रमाणात रासायनिक धूर वातावरणात मिसळतो. याचा त्रास लहान बालक, वृद्ध व्यक्तींना होतो. फटाके फोडताना काळजी न घेतल्यास भाजणे, आग लागणे असे अपघात घडू शकतात. 'फटाक्याचं प्रदूषण टाळू या... निसर्गाला सुंदर बनवूया..' हा मंत्र जगण्याची नितांत गरज आहे. सोबतच इतर गरिबांची अंधारलेली दिवाळी दूर करू या.. चला आनंद वाटू या...

**संजय वाघुळे**/९८२३९३३१२०

### धर्म-निष्ठा-अभ्यास-चिंतन

आपल्या हिंदू धर्मात ग्रंथ, पुराणे यातून धर्म-निष्ठा समजू शकते. त्यानुसार त्याचा अभ्यास व चिंतन करणे आपले कर्तव्य ठरते. प्रत्येक गोष्टीत कुतर्क करणे सोपे असते, पण श्रुतिस्मृती पुराणे ज्ञात असणे अवघड आहे. सातत्याने धर्मात स्वकर्मात राहणे यातच जीवनाचे सार आहे; परंतु त्यासाठी शुद्धी आवश्यक असते. पद्म पुराण सृष्टी खंड ४८ श्लोक ३२ यामध्ये वृद्धशातातप आणि महर्षी व्यासांनीसुद्धा अधिकृत ग्रंथांमधून स्पर्शबाधेचे विवरण उत्तम केलेले आहे. कुष्ठरोगी असो, प्रेताची विल्हेवाट लावणारा असो, गोमांस भक्षण करणारा मनुष्य, कुत्रा, रजस्वला स्त्री, भिल्ल, चांडाळ, पतित, व्यंग्य, वेडा, शव, सुतक असलेला, मेलेली ढोरे ओढून नेणारा, ओली बाळंतीण, कोंबडा, डुक्कर, गाढव, कोल्हा, लांडगा, वानर, कावळा, गिधाड यांचा स्पर्श पवित्र मानला जात नाही त्यासाठी स्नानाने शुद्धी सांगितली आहे. यात काय, त्यात काय असे म्हणून प्रश्न कधीच सुटत नाहीत तर हिंदू धर्माची पताका खांद्यावर घेऊन धर्माचा अभ्यास आणि चिंतनातूनच जीवन पवित्र बनून सार्थकी लागते. ▮

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# बहूराज्यीय सुरेल शास्त्रीय संगीत मैफील गोदा काठी रंगली

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ नोव्हेंबर**

नांदेड दिवाळी पहाट २०२४ उपक्रमात, पटीयाला शाम चौरसीया घराण्याचे व गुरुमित्त संगीत परंपरे जगभर घेवून जाणारे, ख्यातनाम गायक श्री सतनिंन्दर सिंग बोडल यांची, संपुर्णतः शास्त्रीय संगीतावर आधारीत 'गुरु गोबिंद दा दरबार' हि सांगितीक मैफिल, बंदाघाट, नांदेड येथे गुरुवारी सायंकाळी रंगली. पावसाची सर येऊन गेल्यावरही, रसिकांनी चांगली दाद देत, यामैफिलीचा आस्वाद घेतला. मैफिलीची सुरुवात सरस्वती रागातील बंदिशीने करण्यात आली. त्यानंतर दरबारी रागातील अजब तेरी दुनिया मेरे मालिक या ओळींनी रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकले.

माऊली धरती माऊली आकाश गत गत गवलिया अथम प्रकाश, कबीर को स्वामी सबसमान या गुरुग्रंथ साहेब मधील संत कबीर यांच्या शबद नी उत्कट भक्ती रसाचा प्रत्यय रसिकांना दिला. राजा राम माऊली या अनंत भय या शबद मधून सर्वव्यापी सर्वश्रेष्ठ ईश्वर हा अनादी अनंत आहे या सत्याचा पुनर्प्रत्यय रसिकांना दिला.

सगळ्या जगाचा निर्मिक ईश्वर असून त्या ईश्वराने गुरुकृपेमुळे आम्हाला हा जन्म लाभला आहे ही धरती आणि हे आकाश त्याच्या कृपेच्या परिघात व्यवस्थित आपापले काम करीत आहेत आणि सजीव सृष्टीतील प्रत्येकाच्या तो हृदयात आहे आणि ईश्वरानेच सर्वांचे हृदय प्रकाशित केले आहे, असा बहुमोल संदेश या शबद मधून प्रक्षेपित झाला. श्री बोडल हे पंजाबी भाषिक असूनही त्यांनी संत तुकारामाची रचना असलेला अभंग ज्ञानियांचा राजा गुरु महाराव हा अत्यंत ताकदिने पेश करून या भजनाने रसिकांची मने जिंकली. बंदाघाटचे संध्याकाळचे पवित्र वातावरण, मागे वाहत असलेली गोदामाय व बाजूला गुरुद्वारातील पावित्र्य आणि ह्या सर्व सुमंगल वातावरणात भक्तीरसाचा परिपोष असा सुरेख मेळ जमला आणि त्यामुळे निखळशास्त्रीय संगीतामुळे या सुरेख मैफिलीची आस्वाद्यता वाढत गेली. गुरु मानियो ग्रंथ हे व्यक्ती पूजा संपवून विचारांची पूजा करण्याचे आदेश गुरुगोविंद सिंग यांनी नांदेडच्या भूमीत दिले होते ही बाब श्री बापू दासरी यांनी आपल्या निवेदनातून ठळकपणे अधोरेखित केली व या मैफिलीचे सुरेख सूत्रसंचालन केले. या मैफिलीत तबल्याची साथ श्री सतनिंन्दर सिंग बोडल यांचे थोरले बंधु सुखदेव सिंग बोडल व हार्मोनियम साथ त्यांचे पट्टशिष्य मनप्रीत सिंग यांनी दिली. या मैफलीस व्हायोलीन साथ पंकज शिरभाते, आणि बासरी साथ नवोदीत उदयोन्मुख कलाकार अनहद ऐनोद्दिन वारसी यांनी दिली. जिल्हाधिकारी अभिजित राऊत, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या मार्गदर्शनात या शास्त्रीय संगीत मैफिलीचे संकल्पक श्री मकरंद दिवाकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# आ. केरामांनी घेतले आई तुळजा भवानीचे दर्शन


**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०१ नोव्हेंबर**



दीपावली सणाच्या पार्श्वभूमीवर पवित्र अशा लक्ष्मीपूजनाच्या दिनी किनवट माहूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांनी सालाईगुडा येथील आई तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले असून यावेळी त्यांनी मतदारसंघातील सर्व जनतेला सुख-समृद्धी लाभो असे साकडे देवीला घातले आहेत.

हिंदू धर्मातील सर्वात पवित्र अशा दीपावली सणाला प्रारंभ झाला असून यानिमित्त किनवट माहूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांनी लक्ष्मीपूजनाच्या दिनी सलाईगुडा येथील आई तुळजा भवानी मंदिराला भेट देऊन मनोभावे पूजा अर्चना केली आहे. यावेळी त्यांनी किनवट माहूर तालुक्यातील सर्व जनतेला दीपावली सणानिमित्त सुख समृद्धी लाभो असे साकडे देवीला घातले आहेत.याप्रसंगी त्यांच्यासमवेत आई तुळजाभवानी मंदिर समितीचे अध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य संजय राठोड, भारत लिंबाजी राठोड, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार,बाबुराव केंद्रे शिवा आंधळे हे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त




### मतदार जनजागृतीसाठी स्वीपच्यावतीन विविध उपक्रमाचे आयोजन

**नांदेड**-१६-नांदेड लोकसभा पोट निवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदान टक्केवारी वाढवण्यासाठी ८७-नांदेड दक्षिण स्वीप कक्षाच्यावतीने आतापर्यंत नवनवीन उपक्रम घेण्यात येत आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून जास्तीत जास्त मतदान जनजागृती करण्याचा संकल्प केला जात आहे. याचाच एक भाग म्हणून आज ३१ ऑक्टोबर रोजी जि.प.हायस्कुल मुलांच्या शाळेतील प्रशस्त भव्य मैदानात खुल्या चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा विविध अशा खुल्या तीन गटात संपन्न झाली. सर्वांसाठी खुला गट वयाच्या अटीशिवाय हा गट होता, दुसरा गट केवळ विद्यार्थी गट तर तिसरा दिव्यांग गट असा होता. प्रत्येक गटात अत्यंत उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. बहुसंख्य स्पर्धकांनी चित्रकला व रांगोळी अशा दोन्ही गटात आपापली कला सादर केली. दोन्ही गटात एकूण ४६ स्पर्धकांनी भाग घेतला. नांदेड दक्षिण परिसरासह इतरही परिसरातील स्पर्धक या स्पर्धेत सामील झाले होते. शाळा,महाविद्यालय, विविध सामाजिक संस्थासह व्यक्तिगत रुपात सुध्दा या स्पर्धेत स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला होता. यामध्ये आस्था एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटीचे नृसिंह राव दांडगे कॉलेज ऑफ पॅरामेडिकल सायन्स, नांदेड, मुक्ता साळवे बहुउद्देशिय सामाजिक संस्था, नांदेड, निर्मिती नरसिंग कॉलेज, नांदेड,म.न.पा.वजिराबाद शाळा, क्रमांक एक , महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर व विजय नगर, सैनिकी विद्यालय, शारदा नगर,सगरोळी, शिवशंकर माध्यमिक विद्यालय, बन्नाळी, देगलूर, कला महाविद्यालय, छ. संभाजीनगर, कला महर्षी त्र्यंबक वसेकर, चित्रकला महाविद्यालय, नांदेड अशा विविध संस्थेचे विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला. चित्रकला व रांगोळी स्पर्धेत एकूण ४६ स्पर्धकांनी सहभाग घेतला. चित्रकला स्पर्धा विद्यार्थी गटात फुरखान बेग निर्मिती नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्याचा प्रथम क्रमांक आला तर द्वितीय सिध्दी संतोष बरडे, महात्मा फुले हायस्कूल, बाबानगर, तृतीय दिक्षा प्रकाश गजभारे, म.न.पा.प्रा.शा.क्रमांक एक वजिराबाद, नांदेड यांनी प्राप्त केला आहे. चित्रकला खुल्या गटात प्रथम क्रमांक बालाजी पेटेकर खतगावकर, माणिक नगर, द्वितीय क्रमांक आकाश संतोष वाघमारे तर तृतीय क्रमांक कृष्णा रामप्रसाद पिंपरणे यांनी प्राप्त केला आहे. रांगोळी विद्यार्थी गटात प्रथम वैष्णवी त्रिशरण सोनकांबळे, म.न.पा.शाळा, वजिराबाद , द्वितीय रोहिणी राजेश पोहरे, निर्मिती नर्सिंग महाविद्यालय, नांदेड आणि तृतीय दिक्षा प्रकाश गजभारे, म.न.पा.प्रा.शा.वजिराबाद, यांनी प्राप्त केला. रांगोळी खुल्या गटात प्रथम बालाजी चन्नप्पा पेटेकर ,द्वितीय उज्वला अभयकुमार भावसार-दांडगे आणि तृतीय प्रा.अरुणा लामतुरे यांनी प्राप्त केला. दिव्यांग रांगोळी गटात गोदावरी जंगीलवाड, माणिक नगर यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. परीक्षक म्हणून कविता जोशी, प्रा.राजेश कुलकर्णी व संजय भालके यांनी कार्य केले. सर्व यशस्वी स्पर्धकांना लवकरच एका कार्यक्रमात सन्मानपत्र देवून सन्मानित केले जाणार आहे. .

### महायुतीकडून घेण्यात आलेला आक्षेप फेटाळला; घिसेवाड यांच्या बाजूने निकाल

**नांदेड**-नामनिर्देशन पत्राच्या छानन्नी दरम्यान महायूतीकडून वकिला मार्फत घिसेवाड यांचे नामनिर्देशन पत्रातील नमूद केलेल्या माहितीवर आक्षेप नोंदविण्यात आला होता जूने प्रकरण उकरुन काढून बहुजन नेते नागनाथ घीसेवाड यांच्य् अर्जावर आक्षेप घेण्यात आला होता नोंदविण्यात आलेल्या आक्षेपाची बाजू तपासून निवडणूक निर्णय अधिकार्‍यांनी तो आक्षेप फेटाळून लावत घिसेवाड यांच्या बाजूने निकाल दिल्याने घिसेवाड यांचे समर्थकात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले दूपारपासून या विषयावर चर्चा झाली सायंकाळी पाच वाजेनंतर निर्णय लागला घिसेवाड यांचे बाजूने निर्णय लागताच असंख्य बहूजन कार्यकर्ते तहसील कार्यालयाकडे धाव घेऊन नागनाथ घीसेवाड यांचे अभिनंदन केले त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे असंख्य बहूजन कार्यकर्ते एकत्र येवून फटाक्यांची आतिषबाजी करुन जल्लोष करण्यात आला यावेळी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते एका सर्वसामान्य बहुजन समाजाच्या कार्यकर्त्यांना राजकारणातून संपवण्याचा हा कुटील डाव न्याय प्रक्रियेमध्ये टिकला नसल्याने या कपटी राजकारण्याच्या विरोधात जनतेमध्ये संतापाची लाट पसरली येणाऱ्या निवडणुकीमध्ये त्यांना त्यांची जागा दाखवू अशी भूमिका मतदारांनी घेतल्याची चर्चा आहे.

# जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ नोव्हेंबर**

नांदेड जिल्ह्यात ३ नोव्हेंबर २०२४ चे सकाळी ६ वाजेपासून ते १७ नोव्हेंबर २०२४ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात ३ नोव्हेंबर चे सकाळी ६ वाजेपासून ते १७ नोव्हेंबर २०२४ रोजी मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

# मतदारांसाठी मतदान केंद्रावर सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करा: निरीक्षकांकडून आढावा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ नोव्हेंबर**

नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व नांदेड विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडणूक आयोगाने सुचवल्याप्रमाणे सर्व सुविधा उपलब्ध करा. हिवाळ्यातील छोटा दिवस बघता प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक प्रकाश यंत्रणा असावी, असे आवाहन निवडणूक निरीक्षकांनी आज केले.

नांदेड जिल्ह्यातील लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आलेल्या सामान्य ,खर्च आणि पोलीस निरीक्षकांची एकत्रित बैठक आज नांदेड विश्रामगृहामध्ये झाली. या बैठकीला श्रीमती बी. बाला माया देवी (भाप्रसे),शेलेंद्रकुमार (भाप्रसे),श्रीमती पल्लवी आकृती (भाप्रसे) रण विजय यादव (भाप्रसे) कालु राम रावत (भापोसे), मृणालकुमार दास (आयआरएस) मयंक पांडे (आयआरएस),ए.गोविंदराज(आयआरएस) त्यांच्यासोबतच जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महानगरपालिका आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगांवकर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त जिल्हाधिकारी संदीप माळोदे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, निवडणूक उपजिल्हाधिकारी राजकुमार माने, याशिवाय या निवडणुकीमध्ये जबाबदारी सोपविण्यात आलेले प्रत्येक विभागाचे नोडल अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी निवडणुकी संदर्भात केलेल्या उपाययोजना व निवडणूक आयोगाने केलेल्या सूचनेनुसार जिल्ह्यातील केलेल्या तयारीचा आढावा सादर केला. जिल्ह्यातील संवेदनशील केंद्र, यापूर्वी दाखल झालेले गुन्हे, आतापर्यंत जिल्ह्यामध्ये दाखल झालेली जानमालाची जप्ती, कर्मचाऱ्यांची उपलब्धता मतदान व मतमोजणी केंद्रांची रचना व तयारी याबाबतचा एकूण आढावा सादर केला.

# 'दिवाळी अंकांच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीचे जतन': हेमंत पाटील

## नयन प्रकाशनाच्या 'नयन अक्षर' दिवाळी अंकाचे थाटात प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ नोव्हेंबर**

दिवाळी अंकांच्या माध्यमातून मोबाईल युगातही वाचनसंस्कृतीचे जतन आणि सांस्कृतिक ठेवा जतन करण्याचं काम सातत्याने केलं जातं. अलीकडे वाचनसंस्कृती कमी होत चाललेली आहे. क्षीण होत चाललेल्या वाचनसंस्कृतीला बळ देण्याचं काम दिवाळी अंकासारखे प्रयोग सातत्याने करत असतात, असे मत कॅबिनेट मंत्री तथा बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष आ. हेमंत पाटील यांनी व्यक्त केले.

नांदेड येथे नयन प्रकाशनाच्या 'नयन अक्षर' दिवाळी अंकाचे प्रकाशन हेमंत पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोदावरी बँकेच्या अध्यक्षा तथा सामाजिक कार्यकर्त्या राजश्री पाटील होत्या. यावेळी



सौ. कमलबाई पाटील, नयन अक्षर मासिकाचे मुख्य संपादक-संचालक संदीप काळे, कार्यकारी संपादक, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत, कादंबरीकार डॉ. मथुताई सावंत, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी गावंडे, डॉ. अवधूत निरगुडे, सृजन कम्युनिकेशनचे किशोर अटकोरे, मुर्तुजा अथर, डॉ. संकेत सावंत यांची यावेळी उपस्थिती होती.

वाचनसंस्कृतीला गती द्यायची असेल, तर आपली संस्कृती, भोवतालचे जगणे आणि सर्वसामान्यांचे जिवंत अनुभव साहित्यात आले पाहिजेत. त्यामध्ये नावीन्य, वास्तविकता आणि सत्य असलं पाहिजे. साहित्याला वास्तविक जीवनाची जोड जोपर्यंत मिळणार नाही, तोपर्यंत ते साहित्य अंतःकरणाला भिडत नाही. प्रकाशनाच्या माध्यमातून नव्या लेखकांचे प्रयोगशील उपक्रम आणि सामाजिक दायीत्वाने प्रेरित असलेली नवी पुस्तकं सातत्याने येऊ लागली आहेत. भविष्यातील नयन प्रकाशनाच्या अभिनव उपक्रमांसाठी माझ्या शुभेच्छा आहेत, असेही हेमंत पाटील यावेळी म्हणाले.

एक विषय घेऊन दिवाळी अंक काढायचा, त्यात सातत्य ठेवायचे. पुन्हा नवनवीन प्रयोग करायचे हे सोपे काम नाही. मुळात नव्या वाचकाला वाचनासाठी प्रोत्साहित करणे, त्याला नेहमी दर्जेदार साहित्य देत राहणे, ही सुद्धा एक चळवळ आहे. नयन प्रकाशनाच्या माध्यमातून राज्यात वाचनसंस्कृती टिकवण्यासाठी सुरू झालेली चळवळ अजून गतिमान झाली पाहिजे, अशा शब्दांत सौ. राजश्री पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी आ. हेमंत पाटील यांनी संदीप काळे आणि डॉ. सुरेश सावंत यांचा हृद्य सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# रासायनिक खताचा कृत्रिम तुटवडा

**तभा वृत्तसेवा**
**निवघा बाजार,दि. ०१ नोव्हेंबर**


हदगाव तालुक्यातील निवघा बाजार सर्वात मोठी बाजारपेठ असून २० ते २२ खेडे त्यांना खरेदीसाठी येथे यावे लागते सध्या रब्बी पिका हंगामातून पेरणी करिता खताची खरेदी करण्यासाठी शेतकरी या बाजारपेठेत येत आहेत तरी बाजारपेठेत आल्यावर दुकानावर गेले असता शेतकऱ्यांना असे आढळून येत आहे दुकानदाराने रासायनिक खताचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला आहे रासायनिक खते घ्यायचे असेल तर त्यासोबत तुम्हाला ५३० किमतीची गंधक बॅग अन्यथा अन्यथा खत मिळणार नाही आवश्यक नसतानाही गंधाराची बॅग शेतकऱ्याच्या माथी मारत आहेत परतीच्या पावसामुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे थोडाफार माल त्या वाचलेल्या मालाला भाव नाही त्या पैशावर का दिवाळी करावी दुकानदारा मार्फत शेतकऱ्यांची लूट होत आहे कृषी विभाग दुर्लक्ष करत आहे अशी शेतकऱ्यातून तीव्र भावना आहे.

# दिवाळी पहाट कार्यक्रमात मतदानाची शपथ आणि आवाहन



**नांदेड जिल्हा प्रशासन, सचखंड गुरुद्वारा बोर्ड, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नागरी सांस्कृतिक समितीच्या वतीने बंदा घाट येथे आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, व अनुराधा राऊत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर,सुनील नेरळकर,बापू दासरी, गजानन पिंपरखेडे, विजय जोशी, वसंत मैय्या, हर्षद शहा, सुरेश जोंधळे, आदी सदस्य उपस्थित होते.यावेळी डॉ नंदकुमार मुलमुले यांची संकल्पना असलेल्या लक्षदीप हे कार्यक्रमात मुंबई येथील गायिका अनुजा वर्तक,सई जोशी, नितांशु सावंत आणि संचाने रसिकांना आपल्या सुश्राव्य गायनाने मंत्रमुग्ध केले. यावेळी मोठ्या संख्येने नांदेडकर रसिक उपस्थित होते. यावेळी आगामी लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले व शपथ घेण्यात आली.**

# गोडसे परिवाराच्यावतीने घरपोच फराळाचे बॉक्स वाटप



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ०१ नोव्हेंबर**

मुदखेड येथील गोडसे परिवाराच्यावतीने दिपवाळी निमित्त फराळाचे पाच हजार बॉक्स मुदखेड शहरात घरपोच वाटप करण्यात आले. गोडसे परिवार हा नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असतात गोडसे परिवारानी दिवाळी हा सण साजरा करीत असताना शहरातील प्रत्येकांच्या घरो घरी जाऊन मिठाई व फराळाचे पाच हजार बॉक्स गोरगरिबांना घरपोच देऊन दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

कैलास गोडसे यांनी असे सांगितले आहे कि आमच्या परिवारातील विश्वनाथ दिगंबरराव गोडसे, बालाजी विश्वनाथ गोडसे, सुरेश विश्वनाथ गोडसे, सुमित बालाजी गोडसे, गोविंदा बालाजी गोडसे, साई कैलास गोडसे,अक्षय सुरेश गोडसे, यांच्या वतीने दिवाळी हा सण शहरातील प्रत्येकांच्या घरी साजरी झाली पाहिजे या हेतूनी हा उपक्रम राबविण्यात आला आहे. बालाजी पांचाळ, पप्पू जोगदंड, अमोल राठोड, सचिन सूर्यवंशी, यांनी कलेजी देवी मंदिरापासून ते मुदखेड शहरातील प्रत्येकाच्या घरी जाऊन घरपोच फराळाचे पाच हजार बॉक्स वाटप केले आहे.

# उमेदवारी अर्ज छाननीत ३१पैकी ०२ उमेदवार अवैध घोषित

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ०१ नोव्हेंबर**

८३-किनवट विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणुक २०२४ नामनिर्देश अर्जाची छाननी काल दि.३० ऑक्टोबर रोजी निवडणुक निर्णय अधिकारी ०८३ किनवट विधानसभा मतदारसंघ यांचे कार्यालय येथे करण्यात आली.त्यात उमेदवारी अर्ज भरलेल्या एकूण ३१ इच्छुकांपैकी निरंजन बाबाराव केशवे व भिमराव काशिनाथ पाटील हे उमेदवार अवैध ठरले आहेत.

०८३ - किनवट विधानसभा मतदार संघ सार्वत्रिक निवडणूक २०२४ नामनिर्देशन छाननी काल बुधवार दिनांक ३०/१०/२०२४ रोजी निवडणुक निर्णय अधिकारी ०८३ किनवट विधानसभा मतदारसंघ यांचे कार्यालय येथे करण्यात आली.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीता ०८३ किनवट विधानसभा मतदार संघातून एका सदस्याची निवड करणेची असल्याबाबत मा. भारत निवडणूक आयोगामार्फत दिनांक १५.१०.२०२४ रोजी या निवडणूकीचा कार्यक्रम घोषीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार निवडणूकीची अधिसूचना दिनांक २२.१०.२०२४ रोजी या कार्यालयाकडुन प्रसिध्द करण्यात आलेली आहे. मा. भारत निवडणूक आयोगाकडील पत्रकार परिषद दिनांक १५.१०.२०२४ रोजी घोषीत करण्यात आलेल्या निवडणुक कार्यक्रमानुसार दिनांक २२.१०.२०२४ (मंगळवार) ते दिनांक २९.१०.२०२४ (मंगळवार) या कालावधीत निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून नामनिर्देशन पत्र हे या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

नामनिर्देशीत उमेदवारांचे नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यासाठी मा. भारत निवडणुक आयोगाने ठरवुन दिलेल्या कार्यक्रम पत्रिकेप्रमाणे दिनांक ३०.१०.२०२४ रोजी या निवडणूक निर्णय अधिकारी ०८३ किनवट विधानसभा मतदारसंघ यांचे कार्यालयात सकाळी ठिक ११.०० वाजता नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करतांनाच उमेदवार यांना छाननी व चिन्ह वाटपाची नोटीस वजा सुचना यापुर्वीच देण्यात आलेली होती.

सर्वप्रथम डॉ. शारदा चौंडेकर, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी, ०८३ किनवट विधानसभा मतदार संघ तथा तहसिलदार किनवट यांनी उपस्थित सर्व नामनिर्देशीत उमेदवारांचे तसेच त्यांचे उपस्थित असलेले निवडणूक प्रतिनिधी, सुचक यांचे शब्द सुमनाने स्वागत केले. उपस्थित सर्व नामनिर्देशीत उमेदवारांसह मेघना कावली (भा.प्र.से), निवडणुक निर्णय अधिकारी, ०८३ विधानसभा मतदार संघ, डॉ. शारदा चौंडेकर, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी, ०८३ किनवट विधानसभा मतदार संघ तथा तहसिलदार किनवट, किशोर यादव सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी, ०८३ किनवट विधानसभा मतदार संघ तथा तहसिलदार माहुर, अजय कुरवाडे, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी, ०८३ किनवट विधानसभा मतदार संघ तथा मुख्याधिकारी नगर परिषद किनवट यांचे उपस्थितीत ०८३ किनवट विधानसभा मतदार संघाचे निवडणूक कामी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यास सुरूवात करण्यात आली. सर्व उपस्थितांनी त्यांची उपस्थिती, त्यांचे नाव व दिनांकित स्वाक्षरी आपापल्या उमेदवारांसमोर नोंदवावी तसेच संपूर्ण छाननी प्रक्रियेचे व्हिडीओ शुटींग होत असल्याची देखील नोंद घ्यावी असे निर्देशीत करण्यात आले. नामनिर्देशन पत्राच्या छाननीची सुरूवात ही नामनिर्देशन पत्र दाखल झालेल्या नामनिर्देशनपत्राचे क्रमांकानुसार सुरवात करण्यात येत आहे. यावेळी सर्व उमेदवारांचे नामनिर्देशन पत्रे, त्यासोबतचे प्रतिज्ञापत्र व इतर सहपत्रे सर्व उपस्थितीत उमेदवार व प्रतिनिधींना पाहता येतील किंवा निरीक्षण करता येतील असे सर्व उपस्थितांना सुचना देण्यात आली.

# बारावी परीक्षेचे ऑनलाईन अर्ज करण्यास मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०१ नोव्हेंबर**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावी परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करण्यास ३१ ऑक्टोबर ते २२ नोव्हेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. या परीक्षेचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने ु.ारहर्हीललरीव.ळप या संकेतस्थळावर भरावयाचे आहेत. नियमित विद्यार्थ्यांची अर्ज सरल डाटाबेसवरुन ऑनलाईन पद्धतीने त्यांचे उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत भरावयाची आहेत.

नियमित शुल्क मुदतवाढ तारखा व विलंब शुल्क तारखा तसेच शुल्क, कागदपत्रे जमा करावयाचा कालावधी पुढीलप्रमाणे आहे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आरटीजीएस/एनइएफटीद्वारे पावती/चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रिलिस्ट बुधवार २७ नोव्हेंबर २०२४ पर्यंत जमा करावयाची आहे.

व्यवसाय अभ्यासक्रम घेणारे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परिक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, आयटीआय (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) चे विषय घेवून परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा अर्ज नियमित शुल्कासह ३१ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर पर्यंत तर विलंब शुल्कासह १५ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर २०२४ पर्यंत ही मुदतवाढ देण्यात आली आहे. सर्व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी अर्ज भरण्यापूर्वी कॉलेज प्रोफाईल मध्ये कॉलेज, संस्था, मान्यताप्राप्त विषय, शिक्षक याबाबतची योग्य माहिती भरून मंडळाकडे पाठविणे आवश्यक आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा राज्यात एकही मुख्यमंत्री होऊ शकला नाही

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, ०१ ऑक्टोबर**

महाराष्ट्रात आतापर्यंत जेवढे मुख्यमंत्री झाले, त्यातील बहुतांश भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे होते. अविभाजित शिवसेनेचे तीन तर, भाजपाचा एक मुख्यमंत्री झाला. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेसचा एकही मुख्यमंत्री आतापर्यंत झाला नाही.

अध्यक्ष शरद पवार यांनी चारवेळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषवले, पण ते पहिल्यांदा पुलोदचे नेते म्हणून व नंतर तीनवेळा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते म्हणून. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते म्हणून त्यांना एकदाही मुख्यमंत्री होता आले नाही वा त्यांच्या पक्षाचा दुसरा कोणताही नेता मुख्यमंत्री झाला नाही.



१९९५ नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडी सरकारचे युग सुरू झाले आणि महाराष्ट्रात उपमुख्यमंत्रिपदही तयार करण्यात आले. शिवसेना आणि भाजपा आघाडीने १९९५ च्या निवडणुकीत बहुमत मिळवले आणि अविभाजित शिवसेनेचे मनोहर जोशी आघाडी सरकारचे मुख्यमंत्री झाले. भाजपाचे गोपीनाथ मुंडे उपमुख्यमंत्री झाले. मनोहर जोशी यांच्यानंतर अविभाजित शिवसेनेचेच नारायण राणे यांनी मुख्यमंत्रिपद भूषवले. गोपीनाथ मुंडे यांच्याकडील उपमुख्यमंत्रिपद कायम राहिले. शिवसेनेचे उद्धव ठाकरे यांनीही २०१९ मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्याने मुख्यमंत्रिपद सांभाळले.

१९९९ मध्ये शरद पवार यांनी काँग्रेसमधून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. काँग्रेसविरुद्ध निवडणूक लढवून शरद पवार यांचा पक्ष काँग्रेस आघाडीच्या सरकारमध्ये सामील झाला. म्हणजे सत्तेवर होती काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी तर, विरोधात होती शिवसेना-भाजपा आघाडी.

काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीत मुख्यमंत्रिपद काँग्रेसकडे व उपमुख्यमंत्रिपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे असा जणू अलिखित करार होता. एकदा राष्ट्रवादी काँग्रेसचे संख्याबळ काँग्रेसपेक्षा थोडे जास्त असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचा मुख्यमंत्री होऊ शकला असता, पण काका शरद पवार यांनी पुतण्या अजित पवार यांच्या आयुष्यातील ती संधी गमावली. त्यानंतर अजित पवार यांच्या आयुष्यात मुख्यमंत्री होण्याची संधी कधी आलीच नाही आणि आता येण्याची शक्यताही दिसत नाही. अजितदादा यांनी सहा-सात वेळा उपमुख्यमंत्रिपद भूषवले. दादांचा जन्मच जणू उपमुख्यमंत्रिपदासाठी झाला, असे वाटण्यासारखी स्थिती आहे. २०१४ मध्ये शिवसेनेपेक्षा भाजपाचे आमदार जास्त असल्यामुळे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले.

१९९९ नंतर महाराष्ट्रात टू-बाय-टू बससारखी दोन-दोन पक्षांच्या आघाडीत लढत व्हायची. यावेळी २०२४ च्या निवडणुकीत तीन-तीन पक्षांच्या दोन आघाड्यात लढत होत आहे. शिवसेनेत फूट पडून दोन शिवसेना तयार झाल्या, तर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही फूट पडून त्याचे दोन गट तयार झाले. भाजपाच्या नेतृत्वातील आघाडीत मूळ शिवसेना आणि मूळ राष्ट्रवादी काँग्रेस आहे. ही आघाडी महायुती म्हणून तर काँग्रेसच्या नेतृत्वातील आघाडीत उबाठा आणि शरद पवार गट. ही आघाडी महाविकास आघाडी म्हणून ओळखली जाते. त्यामुळे यावेळच्या विधानसभा निवडणुकीत महायुती जिंकणार की महाविकास आघाडी याचे उत्तर २३ नोव्हेंबरच्या मतमोजणीनंतर मिळणार आहे. ■

## ठाकरे गटाच्या उमेदवाराला हृदयविकाराचा झटका

◆ **जळगाव, ०१ ऑक्टोबर**

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे चोपडा विधानसभा मतदारसंघातील उमेदवार प्रभाकर सोनवणे यांना प्रचाराला निघताना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना जळगाव येथील रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. प्रभाकर सोनवणे गुरुवारी सकाळी जळगाव येथून चोपड्याला प्रचारासाठी जात होते. रस्त्यात ममुराबाद गावालगत त्यांना गाडीतच हृदयविकाराचा झटका आला. हे पाहून त्यांच्यासोबत असलेले कार्यकर्ते घाबरले. पण, प्रसंगावधान राखून त्यांनी लगेच त्यांना जळगाव येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी प्रभाकर सोनवणे यांच्यावर अँन्जिओग्राफी केली. त्यात त्यांना दोन ब्लॉकेज आढळले. सोनवणे यांना हृदयविकाराचा झटका आल्याची बातमी मतदारसंघात वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर त्यांच्या समर्थकांसह नातलगांनी रुग्णालयाच्या दिशेने धाव घेत त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतली. ◀(वृत्तसंस्था)

# सरकार आणि मुख्यमंत्री महायुतीचाच

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास**

**काँग्रेस नेते रवी राजा, उबाठाचे बाबू दरेकर यांचा भाजपा प्रवेश**



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी मुंबईत गुरुवारी आयोजित पत्रपरिषदेत एकमेकांना पेठा भरविला

◆ **मुंबई, ०१ ऑक्टोबर**

जनतेचा महायुतीवर पूर्ण विश्वास असल्यामुळे राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा येणार आणि महायुतीचाच मुख्यमंत्री होणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी व्यक्त केला. मुख्यमंत्री महायुतीचाच होईल, ही काळ्या दगडावरची पांढरी रेष असल्याचे ते म्हणाले.

मुंबई महानगरपालिकेतील माजी विरोधी पक्ष नेते, वरिष्ठ काँग्रेस नेते रवी राजा, उबाठाचे उपविभागप्रमुख बाबू दरेकर यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह भाजपात प्रवेश केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. यावेळी मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार, आ. तमिल सेल्वन, आ. पराग शहा, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, अतुल शाह, राजेश शिरवडकर आदी उपस्थित होते. फडणवीस आणि शेलार यांनी रवी राजा, बाबू दरेकर यांचे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत केले. यावेळी रवी राजा यांची भाजपा मुंबई उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे आ. शेलार यांनी जाहीर केले.

फडणवीस म्हणाले की, महापालिका ज्यांनी कार्यकर्तृत्वाच्या बळावर गाजवली, असे काँग्रेसचे मातब्बर नेते रवी राजा यांनी भाजपात प्रवेश केला, ही अतिशय आनंदाची बाब आहे. २३ वर्षे बेस्टचे सदस्य म्हणून प्रभावी कामगिरी राजा यांनी बजावली होती. त्यांचा अनुभव, दांडगा जनसंपर्क याचा भाजपाला निश्चितच फायदा होणार आहे. राजा यांच्या संपर्कामुळे आगामी काळात काँग्रेसचे अनेक प्रमुख नेते भाजपात प्रवेश करतील. उबाठाचे उपविभागप्रमुख दरेकर यांच्या प्रवेशामुळे भाजपाची घाटकोपरमधील ताकद वाढणार आहे.

राजा यांच्या भाजपा प्रवेशाने सायन कोळीवाडा परिसरात आणि बाबू दरेकर यांच्या प्रवेशामुळे घाटकोपर परिसरात भाजपाची ताकद वाढेल, असे शेलार म्हणाले. काँग्रेसने आपल्या अनुभवाचा फायदा करून घेतला नाही. आपण कोणत्याही पदाच्या अपेक्षेने भाजपात आलो नाही. यापुढे भाजपाची ताकद वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करू, असे राजा यांनी सांगितले. ◀(तभा वृत्तसेवा)

### बंडखोरांची समजूत काढू

वरिष्ठ नेते गोपाळ शेट्टी यांची समजूत काढण्याचे प्रयत्न सुरू असून, त्यात आम्हाला यश येईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. काही ठिकाणी महायुतीतील कार्यकर्त्यांनी परस्परांच्या विरोधात उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत बैठक झाली असून, एकमेकांच्या विरोधातील उमेदवार मागे घेण्यात यश मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. काही ठिकाणी पक्षांतर्गत बंडखोरी झाली आहे. त्यांच्याशी आमचे बोलणे सुरू असून, त्यातही आम्हाला यश येईल, अशी अपेक्षा फडणवीसांनी व्यक्त केली. ■

## आमदार जयश्री जाधवांचा शिवसेनेत प्रवेश; काँग्रेसला मोठा धक्का

◆ **मुंबई, ०१ ऑक्टोबर**

कोल्हापूर उत्तरच्या विद्यमान आमदार जयश्री जाधव यांनी काँग्रेसला रामराम करीत शिवसेनेत प्रवेश केला. हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे.

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसने राजेश लाटकर यांना दिलेली उमेदवारी मागे घेत मधुरिमाराजे मालोजीराजे छत्रपती यांना तिकीट जाहीर केले. त्यामुळे नाराज झालेल्या राजेश लाटकर यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला. २०२२ मध्ये चंद्रकांत जाधव यांच्या निधनामुळे कोल्हापूर उत्तरमध्ये पोटनिवडणूक झाली होती. तेव्हा, काँग्रेसकडून जयश्री जाधव यांना तिकीट देण्यात आले होते. जयश्री जाधव यांनी भाजपाच्या सत्यजित कदम यांचा १८ हजार ९०१ मतांनी पराभव केला होता. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत विद्यमान काँग्रेस आमदार जयश्री जाधव यांना उमेदवारी नाकारण्यात आली. त्यामुळे जयश्री जाधव नाराज होत्या. अखेर नाराज असलेल्या या क्षेत्राच्या आमदार जयश्री जाधव यांनी थेट शिवसेनेत प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत जयश्री जाधव यांचा हा प्रवेश झाला. प्रवेशानंतर जयश्री जाधव यांना शिवसेना महिला आघाडीचे उपनेतेपदही देण्यात आले. जाधव यांच्या प्रवेशामुळे कोल्हापूर उत्तरचे शिवसेनेचे उमेदवार राजेश क्षीरसागर यांना पाठबळ मिळणार आहे. ◀(तभा वृत्तसेवा)



राज्यात सध्या दिवाळी आणि निवडणुकीची धामधूम सुरू आहे. याचेच औचित्य साधत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी ठाण्यातील मसुंदा सरोवराच्या परिसरात दिवाळी उत्सवाचे आयोजन केले होते. यात शिवसेना समर्थक आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

# गोधरा घटनेवरील पुस्तकावर बंदी

**जयपूर, ०१ ऑक्टोबर**

राजस्थान सरकारने गोधरा घटनेवर आधारित पुस्तक मागे घेण्याचा आदेश जारी केला आहे. सर्व शाळांना वितरित केलेली पुस्तके परत मागवण्यास सांगण्यात आले आहे तसेच पुस्तके खरेदी करण्याच्या सूचना रद्द करण्यात आल्या.मागील गहलोत सरकारच्या काळात राजस्थानच्या शालेय अभ्यासक्रमात 'अदृश्य लोग- उन्मीद और साहस की कहानियाँ' नावाचे पुस्तक समाविष्ट केले होते. ते आता काढून टाकण्याचा निर्णय घेण्यात आला. या पुस्तकात गोधरा घटनेबाबत खोटे परविण्यात आले असून, समाजात फूट पाडली जात आहे, असे राजस्थानचे शिक्षणमंत्री मदन दिलावर यांचे म्हणणे आहे. पुस्तकात गोधरामध्ये ट्रेन जाळणाऱ्यांचा गौरव केला जात असूनण हिंदूंना गुन्हेगार म्हणून सादर करण्यात येत आहे. गुजरातच्या तत्कालीन सरकारबद्दलही चुकीच्या गोष्टी लिहील्या गेल्या आहेत. माजी शिक्षणमंत्री गोविंद सिंग दोतासरा यांनी मुद्दाम अशी पुस्तके राजस्थानातील मुलांना शिकवण्याचा कट रचल्याचा आरोप दिलावर यांनी केला.

## इति-उवाच...



अजित पवार कधी जातीपातीच्या राजकारणात अडकले नाहीत. शरद पवार जे आजपर्यंत करीत आले, त्यात इतक्या वर्षांत तुम्हाला ती गोष्ट करताना अजित पवार कुठे दिसणार नाहीत. मला वाटते, ही एक सकारात्मक गोष्ट आहे.

**राज ठाकरे,** मनसे प्रमुख



शरद पवारांनी शिवाजीराव देशमुख सभापती असताना त्यांच्या आजारपणात अविश्वासाचा ठराव आणला होता. मी दोनदा गोट्या खेळून आमदार झालो नाही, पवारसाहेब ही तुमची गद्दारी आहे आणि त्या गद्दारीची परतफेड या शिराळा मतदार जनता केल्याशिवाय राहणार नाही.

**सदाभाऊ खोत,** रयत क्रांती संघटना



यंदाची दिवाळी इलेक्शन दिवाळी आहे. चार दिवस फक्त निवडणुकीवरच सर्वांच्या घरात चर्चा सुरू असतील. ५ तारखेनंतर खरे राजकीय फटाके वाजतील.

**छगन भुजबळ,** राकाँ नेते



अजित पवार महाराष्ट्राचे चंद्राबाबू नायडू आहेत. अल्पसंख्यक समाजासाठी आतापर्यंत जितके कोणी काही केलेले नाही, तितके अजित पवार यांनी केले आहे.

**नवाब मलिक,** राकाँ उमेदवार



आपल्या संस्कृतीत एखादा माणूस जातो, तेव्हा त्याच्याबरोबर आपण सगळे सोडून देतो. आपली कटूता, कितीही वैरी असला तरी..., आर. आर. पाटलांबद्दल असंवेदनशीलपणे अजित पवार बोलले, याचे दु:ख आयुष्यभर राहील.

**सुप्रिया सुळे,** खासदार

# मराठा-दलित-मुस्लिम एकत्र येण्यावर एकमत

**मनोज जरांगे पाटील यांची घोषणा**

## ३ तारखेला उमेदवारांची घोषणा

◆ **जालना, ०१ ऑक्टोबर**

विधानसभा निवडणुकीत उमेदवार द्यायचे की नाही, या संदर्भात चर्चा करण्यासाठी मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी गुरुवारी बैठक बोलावली होती. अजून काही समीकरणे जुळवणे बाकी असल्याने त्यांनी हा निर्णय शनिवारी पाडव्याला म्हणजेच २ नोव्हेंबरला जाहीर करणार असल्याचे सांगिले होते. मात्र, याच पृष्ठभूमीवर त्यांनी मुस्लिम धर्मगुरू आणि दलित समाजाच्या ज्येष्ठ नेत्यांशी संवाद साधला. या बैठकीत मराठा-दलित-मुस्लिम एकत्र येण्यावर एकमत झाले असल्याचे जरांगे यांनी सांगितले. आता आम्ही एकत्र आलो असून, सत्ता परिवर्तन होणार असल्याचा दावा जरांगे यांनी केला.

केवळ मराठा समाजामुळे निवडणुकीत यश मिळणार नाही. त्यामुळे मुस्लिम व दलित समाजाशीही समीकरणे जुळवण्याचा जरांगे पाटील प्रयत्न करीत आहेत. याच संदर्भात एक निर्णायक बैठक आंतरवाली सराटी येथे बोलावली होती. अन्यायाचे संकट आम्हाला परतून लावायचे असल्याचे जरांगे म्हणाले.

मराठा समाजाने जे स्वप्न पाहिले होते, ते साकार होणार आहे. बदल होत असतो; मात्र परिवर्तन होत नसते. आता आमचे समीकरण पक्के झाले असल्याचे ते म्हणाले. मराठा-दलित-मुस्लिम एकत्र येण्यावर आमचे एकमत झाले आहे. मात्र, कोणत्या जागा कोण लढणार, यावर ३ रोजी निर्णय घेणार असल्याचे जरांगे यांनी म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# ऐन दिवाळीत रवी राजांनी नाराजीची वात पेटवली

◆ **मुंबई, ०१ ऑक्टोबर**

लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुंबई काँग्रेसमध्ये नाराजी उफाळून आली आहे. मुंबई महानगर पालिकेतील काँग्रेसचा प्रमुख चेहरा रवी राजा यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. रवी राजा यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्याकडे आपला राजीनामा पाठवला आहे. यानंतर त्यांनी गुरुवारी सकाळी देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जात आहे.

रवी राजा यांच्या राजीनाम्यानंतर मुंबई काँग्रेसमध्ये आणखी मोठा धमाका होण्याची शक्यता आहे. कारण, रवी राजा यांच्या भूमिकेला पाठिंबा देण्यासाठी मुंबई काँग्रेसमधील काही पदाधिकारी मैदानात उतरले आहेत. या सर्वांनी मुंबई काँग्रेस अध्यक्ष वर्षा गायकवाड यांच्या कार्यपद्धतीवरून उघड नाराजी व्यक्त केली. सायनचे माजी आमदार जग्गनाथ शेट्टी यांचा मुलगा व मुंबई काँग्रेसचे महासचिव अमित शेट्टींनी वर्षा गायकवाड यांच्यावर कठोर शब्दांत टीका केली. त्यांनी म्हटले आहे की, गांधींच्या पक्षात गोडसेंचे राज्य आहे. काँग्रेस विकण्याचे पाप खासदार वर्षा गायकवाड आणि त्यांच्या पतीने केले आहे. ज्येष्ठ नेते रवी राजा पक्ष सोडून गेले, त्याला कारण हे दोघेच आहेत, अशी टीका अमित शेट्टी यांनी केली.



भाजपा प्रवेशप्रसंगी पत्रकारांशी संवाद साधताना रवी राजा

**राजा राजीनामा दिल्यानंतर काय म्हणाले?**

काँग्रेसचा राजीनामा देऊन भाजपात आलेल्या रवी राजा यांनी आपली खंत आणि खदखद बोलून दाखवली. मी गेली ४४ वर्षे प्रामाणिकपणे काम केले, पाच वेळा नगरसेवक होतो, विरोधी पक्षनेता होतो. सायन कोळीवाड्यात मी तिकीट मागितले, पण २०१९ मध्ये हरलेल्या नेत्याला उमेदवारी दिली. काँग्रेसमध्ये मेरीटवर तिकीट देत नाही. लॉबिंग असणाऱ्यांना तिकीट मिळते. दिल्लीत माझा वशिला नाही, असे रवी राजा यांनी म्हटले. ◀(वृत्तसंस्था)

# मंत्रालयात फडणवीसांची नेमप्लेट तोडणाऱ्या महिलेचा अर्ज बाद

**भाजपाचा केला उल्लेख**

◆ **मुंबई, ०१ ऑक्टोबर**

मागील महिन्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील दालनाबाहेरील नामफलकाची मोडतोड करणाऱ्या महिलेने भाजपाकडून विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा प्रयत्न केला, पण तिचा प्रयत्न उधळला गेला. धनश्री सहस्रबुद्धे असे या महिलेचे नाव आहे. सहस्रबुद्धे यांचा अर्ज छाननीत बाद झाला. त्यांनी माहीम विधानसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला होता.

मंत्रालयाची सुरक्षा भेदून थेट उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे दालन गाठून तिथे असलेल्या नामफलकाची तोडफोड केल्याने धनश्री सहस्रबुद्धे चर्चेत आल्या. त्यावेळी तिथे महिला पोलिस नसल्याने सहस्रबुद्धे यांना पकडण्यात आले नव्हते. सहस्रबुद्धे यांनी थेट भाजपाकडूनच उमेदवारी अर्ज भरला. पण, सोबत पक्षाचा एबी फॉर्म नसल्याने त्यांचा अर्ज बाद ठरविण्यात आला. विधानसभा निवडणुकीत माहीम मतदारसंघ चर्चेचा विषय ठरला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे आणि महायुतीकडून शिवसेनेचे आमदार सदा सरवणकर निवडणूक लढत आहेत. ◀(वृत्तसंस्था)

## मतदान आणि मतमोजणीच्या दिवशी मद्य विक्री अनुज्ञप्त्या बंद

**सोलापूर दि. ०१ ऑक्टोबर-**

भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी अधिसूचनेद्वारे विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीनिमित्त सोलापूर जिल्हयात ११ विधानसभा मतदारसंघ आहेत. सदर विधानसभा मतदार संघांमध्ये २० नोव्हेंबर रोजी मतदान व २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार असल्याने, या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने मतदानाची वेळ संपण्यापूर्वी ४८ तास अगोदरपासून तसेच मतमोजणीच्या दिवशी जिल्हयातील सर्व देशी, विदेशी मद्य विक्री, परमिट रूम व ताडी माडीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निर्गमित केले आहेत.

जिल्ह्यात १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजलेपासून पुढे (मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर), १९ नोव्हेंबर रोजी मतदानाच्या पूर्वीचा संपूर्ण दिवस, २० नोव्हेंबर रोजी मतदानाचा संपुर्ण दिवस व २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणीचा संपूर्ण दिवस मद्यविक्री बंद ठेवण्यात यावीत. सोलापूर जिल्ह्यातील सर्व मद्य विक्री अनुज्ञप्तीधारकांनी निवडणूक क्षेत्रातील अबकारी अनुज्ञप्त्या मद्य विक्रीकरीता पूर्णपणे बंद ठेवाव्यात. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित अनुज्ञप्तीधारकाविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, मधील तरतूदीनुसार कडक कारवाई करण्यात येईल व संबंधित अनुज्ञप्ती कायमस्वरुपी रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

# तासगाव कवठेमहांकाळमध्ये तीन रोहित पाटील रिंगणात!

**आबांच्या रोहितसमोर मोठे आव्हान**

◆ **सातारा, ०१ ऑक्टोबर**

तासगाव कवठे महांकाळ विधानसभा मतदारसंघात शरदचंद्र पवार पक्षाचे रोहित आर. आर. पाटील निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांच्या विरोधात भाजपामधून अजित पवार गटात आलेल्या माजी खासदार संजय पाटील आहेत. मात्र, रोहित पाटील यांच्या विरोधात रोहित पाटील नावाचे तीन उमेदवार रिंगणात उतरले आहेत. एक नाव असलेले रोहित पाटील तासगाव कवठेमहांकाळ मतदारसंघात असणार आहेत. मात्र, रोहित रावसाहेब पाटील आणि संजय काका पाटील यांच्यामध्येच खरी लढत होणार आहे.



नावात समानता असलेले उमेदवार दिल्यानंतर खासदार विशाल पाटील यांनी टोला हाणला. ते म्हणाले की, रोहित पाटील यांना निवडणुकीत पाडण्यासाठी खूप प्रयत्न होणार आहेत. आर. आर. सुद्धा निवडणुकीच्या रिंगणात असताना, आर. आर. पाटील नावाचे चार उमेदवार रिंगणात असायचे. पूर्वी एखादा माणूस चुकत होता. मात्र, आता मतपेटीवर फोटो येणार आहे. त्यामुळे रोहित पाटील यांची छबी दिसणारे बटन दाबून मतदान करतील, असा विश्वास विशाल पाटील यांनी व्यक्त केला. ◀(वृत्तसंस्था)

सर्व जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



शुभेच्छूक
राजेश्वर देशमुख
विलासराव देशमुख
------प्रकाशक------
गजानन कन्सट्रक्शन
हदगाव

सर्व जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



शेख युसुफभाई
माजी उपनगराध्यक्ष, भोकर

सर्व जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

CNG PUMP
श्री नृसिंह पेट्रोलियम
म्हैसा रोड, भोकर जि.नांदेड
प्रोप्रा. डॉ.बालाजी बाबुराव पा. अंदबोरीकर




सर्व जनतेस दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !



म.मोईजोदीन म. सलीमोद्दीन
बिडीवाले करखेलीकर
प्रकाशक
प्रो. प्रा. नसरत कन्सट्रक्शन, करखेली

तेजोमय दीप देवावा, आज तुमच्या अंगणी
तेजोमय प्रकाश पडावा, सदैव तुमच्या जनी !

HAPPY दीपावली

ग्राम पंचायत कार्यालय
बाराहाळी
ता.मुखेड जि.नांदेड



सौ.अंजलीताई राजमजी देशपांडे
सरपंच, ग्रा.पं.कार्यालय बाराहाळी

शुभेच्छुक
उपसरपंच-व्यंकटराव वडगे पाटील
व सर्व सन्मानीय सदस्य ग्रा.पं.कार्यालय
प्रकाशक
ग्रामविकास अधिकारी-संजय पाटील
ग्रा.पं.कार्यालय बाराहाळी

सर्व ऊस उत्पादक शेतक-यांना
# दिपावली निमित्य हार्दिक शुभेच्छा ...!

शिऊर साखर कारखाना लि., वाकोडी
ता.कळमनुरी जि.हिंगोली

श्री सुभाष शुगर प्रा.लि., हडसणी
ता.हदगांव जि.नांदेड







**शिऊर साखर कारखान्याचे विक्रमी गाळप**
- सन २०२४-२५ साठी ६ हजार हेक्टर उसाची नोंद
- मागील हंगामात ४ लाख २६ हजार मेट्रीक टन एवढा ऊस गाळप
- सन २०२४-२५ वर्षासाठी ५ लाख मेट्रीक टन गाळपाचे उद्दिष्ट.

**सुभाष शुगरचे विक्रमी गाळप**
- सन २०२४-२५ साठी साडेसहा हजार हेक्टर उसाची नोंद
- मागील हंगामात ५ लाख ४५ हजार मेट्रीक टन एवढा ऊस गाळप
- सन २०२४-२५ वर्षासाठी ७ लाख मेट्रीक टन गाळपाचे उद्दिष्ट.

२ कोटी युनिट विज महावितरणला पुरवठा विज उत्पादनानंतर आता कारखान्याकडून सिएनजी प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर

शिऊर साखर कारखाना वाकोडी डिस्टीलरी प्लॅन्ट कार्यान्वित.

**कारखान्याची प्रमुख उद्दिष्टे**

१.४ मेगावॅटचा सोलार प्लॅन्टचे काम प्रगती पथावर

- पांढरी शुभ्र व दर्जेदार साखर निर्मीती करणे.
- ऊस उत्पादक शेतक-यांना जास्तीत जास्त ऊस दर देणे.
- सवलतीदरा मध्ये ऊस उत्पादक शेतकरी यांना प्रेसमड वाटप करणे.
- ऊस उत्पादक शेतकरी यांच्या सहकार्याने जास्तीत जास्त (उच्चांक) गाळप करणे.
- परीसरातील ऊस उत्पादक शेतकरी, कामगार यांची आर्थिक प्रगती आणि परीसराच्या विकासासाठी कटीबद्ध.

श्री सुभाष शुगर प्रा. लि.कारखान्याच्या माध्यमातुन लवकरच दोन्ही कारखान्यातुन निघणा-या प्रेसमडवर प्रक्रीया करून बायो सीएनजी १०.५ टीपीडी लवकरच तयार करणार.

शेतकरी हितासाठी व समृद्धी साठी सदैव प्रयत्नशील...



मा.श्री.सुभाषराव लालासाहेब देशमुख
चेअरमन

शुभ दिपावली



मा.श्री.सुशिलकुमार सुभाषराव देशमुख
कार्यकारी संचालक


दीपावली
पाडवा
निमित्त
सर्वांना
हार्दिक हार्दिक
शुभेच्छा..!


सर्व विद्यार्थी व नागरिकांना
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले धारूर
शुभेच्छुक :- प्राचार्य जी.के कावडे, सर्व सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती,
शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राजमाता जिजाऊ महाविद्यालय, किल्ले धारूर जि.बीड


दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप. बँक लि.
दिपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा
12%
11%
10%
11%


दिपावली
पाडवा
निमित्त
सर्वांना
हार्दिक हार्दिक
शुभेच्छा..!
आगवत चौरे


फक्त सोनेतारण व वेयर हाऊस
कर्ज देणारी संस्था
सोने
तारण
कर्ज
त्वरीत कर्ज, सोपी प्रक्रिया
श्री सिध्दराज मल्टीस्टेट
अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. माजलगाव


शुभ दिपावली
सर्व सभासद, खातेदार
व हितचिंतक यांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !
सोने खरेदी करा तुम्ही
कर्ज देऊ आम्ही!
सोने खरेदीसाठी
तात्काळ सोनेतारण
कर्ज उपलब्ध !
* शुभेच्छुक *
आर.जी.कानडे
ॲड.रविंद्र कानडे
सर्व सन्माननीय संचालक मंडळ
व कर्मचारी वृंद
श्री मंगलनाथ मल्टीस्टेट
को-ऑप.क्रेडीट सोसायटी लि. (महाराष्ट्र व कर्नाटक)
7720061987, 7507949494
1000


गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्युस्
शुभ दिपावली
डी.फार्मसी
DTE CODE
Diploma 2544/2575
बी.फार्मसी
CODE DEGREE
-2575
एम.फार्मसी
DTE CODE
M.PHARMACY - 2575
बी.ए.एम.एस.
COLLAGE CODE
-3397
फिजिओथेरपी
COLLAGE CODE
-6375
बी.एसी नर्सिंग
COLLAGE CODE
-9377
कॉलेज कॅम्पस : NH-62 गढी रोड, मालीपारगाव फाटा,
माजलगाव जि.बीड 431129
संपर्क : 7620907354 / 9834626659